पखवाज: शास्त्र आणि क्रियात्मक

(Pakhawaj: Theory & Practical)

लेखक

प्रा. डॉ. खिस्ते ओंकार बाळकृष्ण

(एम. ए., एम.फील., पीएच. डी. अर्थशास्त्र., बी. ए. संगीत, विशारद पखवाज)

पखवाज: शास्त्र आणि क्रियात्मक, ISBN: 978-93-5680-354-1:- प्रा. डॉ. खिस्ते ओंकार बाळकृष्ण

IIश्री गणेशाय नम:II

प्रेरणा स्थान

तालमणी, मृदंगाचार्य कै. बाबुराव डवरी गुरुजी

पखवाज: शास्त्र आणि क्रियात्मक

(Pakhawaj: Theory & Practical)

लेखक

प्रा. डॉ. खिस्ते ओंकार बाळकृष्ण

(एम. ए., एम.फील., पीएच. डी. अर्थशास्त्र., बी. ए. संगीत, विशारद पखवाज)

श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा

ता. जामखेड, जि. अहमदनगर

पखवाज: शास्त्र आणि क्रियात्मक, ISBN: 978-93-5680-354-1:- प्रा. डॉ. खिस्ते ओंकार बाळकृष्ण

Title: पखवाज: शास्त्र आणि क्रियात्मक

(Pakhawaj: Theory & Practical)

Author's name: प्रा. डॉ. खिस्ते ओंकार बाळकृष्ण (Dr. Khiste Onkar Balkrishna)

Published by: Self

Publisher's address: "Jyestharaj" Chakradhar Nagar, Pangri Road, Beed, 431122

Edition Details: I

ISBN: 978-93-5680-354-1

Copyright: Dr. Khiste Onkar Balkrishna

तीर्थस्वरूप आईस समर्पित

स्वानंदवासी सौ. मीरा बाळकृष्ण खिस्ते

पखवाज: शास्त्र आणि क्रियात्मक, ISBN: 978-93-5680-354-1:- प्रा. डॉ. खिस्ते ओंकार बाळकृष्ण

प्रस्तावना

अदभ्र विभ्रम भ्रमद् भुजंगं श्वसद् विनिर्गमत् कडम स्फुरत् कराल भाल – हव्यवाट् धिमिद् धिमिद् धिमिद् धिमिद् ध्वनन् मृदंग तुंगमंगल ध्वनि – कडम: प्रवर्तित प्रचण्ड – ताण्डव: शिव: जयतु ।

भारतीय संगीताचा इतिहास हा प्राचीन आहे, त्यात अनेक स्थित्यंतरे आली. काळाच्या ओघात देशा समोर जी जी परिस्थिती निर्माण झाली त्याचे साक्षीदार म्हणून वेगवेगळ्या वास्तू, साहित्य आणि इतर घटक साक्ष देतात या मध्ये संगीत विषयाचाही प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. कारण ज्या ज्या सत्तांनी देशावर राज्य केले त्यांच्या संस्कृतीचा परिणाम संगीत क्षेत्रावर देखील झालेला दिसून येतो उदा. बंदिश किंवा रचना यांची भाषाशैली, बोलांचे प्रचलन आणि वादनाची शैली किंवा त्याचा बाज इ.

राष्ट्र आणि स्वधर्म टिकवून ठेवण्यासाठी ज्याप्रमाणे राष्ट्र आणि धर्म रक्षक लढले, स्वातंत्र यज्ञात जीवाची, कुटुंबाची आणि सर्वस्वाची आहुती दिली, त्याच प्रमाणे संगीतोपासकांनी देखील तत्कालीन काळात भारतीय संगीत टिकवून ठेवण्यासाठी त्याग केला, तसेच त्यांनी अतिशय बिकट आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थिती आणि वेगवेगळ्या आक्रमकांच्या काळात संगीताची उपासना, प्रचार प्रसार हा विविध मते, घराणे आणि परंपरांच्या माध्यमातून अविरतपणे चालू ठेवला. काळ आणि परिस्थिती बदलत आहे. देवाश्रय आणि राजाश्रय संपुष्टात येऊन संगीताला लोकाश्रय प्राप्त झाला. अनेक स्थित्यंतरे निर्माण होताहेत ते होणारच! तरीही वर्तमान स्थितीतही हे कार्य अविरतपणे चालूच आहे.

संगीत क्षेत्रात तबला विषयाचे अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत परंतु पखवाजाच्या संदर्भात खूप कमी साहित्य उपलब्ध असताना दिसून येते, जे साहित्य उपलब्ध आहे ते मराठी भाषेत्तर आहे. पखवाज विषयाचे बरेच विद्यार्थी प्रात्यक्षिक परीक्षेत चांगले सादरीकरण करतात परंतु साहित्याच्या अभावी लेखी परीक्षेला काही प्रमाणात कमी पडतात, हीच स्थिती माझी देखील आहे. म्हणून अभ्यासाच्या दृष्टीने एकाच पुस्तकात

साहित्य उपलब्ध व्हावे यासाठी पखवाजावरील पुस्तक लिहिण्याचे शिवधनुष्य उचलण्याचा प्रयत्न केला आहे. आशा आहे कि संगीत विषाच्या विद्यार्थ्यांना याचा नक्कीच उपयोग होईल...

आज पर्यंत मला तालमणी, मृदंगाचार्य कै. बाबुराव डवरी गुरुजी, श्री. प्यारेलाल चव्हाण (डवरी) नेकनूर, प्रा. पं. श्री. गिरीशजी जोशी (अभिजात गायन साधना केंद्र, औरंगाबाद), प्रा. श्री. महेशजी कुलकर्णी (नादब्रह्म संगीत विद्यालय,बीड), प्रा. श्री. गोपाळ जाधव (लातूर), बहिण सौ. राजश्री ओंकार सेलूकर (तिरुपती) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

संगीत हि विद्या गुरुमुखी सिद्धत्वाला जाणारी कला आहे. गुरुंच्या मार्गदर्शानात विद्यार्जन करावे. या सोबत केवळ संदर्भ म्हणून पुस्तकाचा उपयोग व्हावा हाच एकमेव उद्देश आहे. मी वादक नाही, संगीत विषयाची आवड आणि जिज्ञासा आहे, मित्र आणि विद्यार्थ्यांनी पुस्तक लेखनाचा आग्रह धरला आणि यासाठी श्री गणेशाचा आशीर्वाद तसेच वडील श्री. बाळकृष्ण लक्ष्मणराव खिस्ते, बहिण सौ. धनश्री दुर्गेशराव पत्की, पत्नी सौ. स्वाती या सर्वांच्या प्रेरणेमुळे लिखाण कार्य होऊ शकले. **कन्या द्वय शमी (मयुरी) व दुर्वा (ईश्वरी) यांच्या स्वागतार्थ हे पुस्तक ...**

आमच्या संस्थेचे सचिव मा.डॉ. महेशजी गोलेकर, श्री. विजयसिंह गोलेकर, प्राचार्य डॉ. शिवानंद जाधव आदिंनी लिखाणास प्रोत्साहन दिले तसेच ग्रंथपाल श्री. महेश बजगुडे यांनी लिखाणास पूरक साहित्य उपलब्ध करून दिले त्याबद्दल सर्वांचे आभार.

यथा बुद्धी जे काही चांगले लिहू शकलो ती गुरुकृपा. काही दोष असतील तर ते माझे.

अनावधानाने राहिलेल्या काही बाबी द्वितीय आवृत्ती मध्ये सुधारित स्वरूपात मांडण्यात येतील.

प्रा. डॉ. खिस्ते ओंकार बाळकृष्ण

अनुक्रमणिका

घटक	पृष्ठ क्र.
१. पखवाजाची ओळख	१-६
२. तालातील संकल्पना	७-१३
३. ताल लिपी	१४-१६
४. लय आणि लयकारी	१७-१९
५. ओळख तालांची	२०-५०
६. पखवाजाची घराणे	५१-६०
७. पखवाज वादकांचा जीवन परिचय	६१-७९

१. पखवाजाची ओळख

- उगम
- पखवाजाचे स्वरूप आणि वर्ण

पखवाजाचा उगम

पखवाजच्या इतिहासाच्या संदर्भामध्ये अनेक मत मतांतरे असताना दिसून येतात. पखवाजच्या इतिहासाच्या संदर्भामध्ये विचार केला असता असे लक्षात येते की पखवाजाचा इतिहास हा फार प्राचीन नाही. पंधराव्या शतकापर्यंत कोणत्याही पुस्तकात पखवाजाचा कोणताही उल्लेख झालेला दिसून येत नाही परंतु, प्राचीन काळामध्ये मृदंग या शब्दाचा उल्लेख आढळून येतो. बऱ्याच संगीत तज्ञांच्या मते मृदंगाचे परीवर्तीत रूप म्हणजे पखवाज आहे तसेच. मृदंगाची बनावट किंवा निर्मिती ही मातीपासून झालेली दिसून येते म्हणून यास मृदा चे अंग (मृदंग) म्हणून ओळखले जाते. मृदंगाची बनावट ही मातीपासून झाल्यामुळे मृदंग वादन करत असताना बऱ्याच वेळेस रसनिर्मिती ही चरम सीमेवर असताना मातीचा मृदंग हा भंग होत असे किंवा फुटत असे यामुळे रसभंग होत होता. या वरील पर्याय म्हणून टिकाऊ अशा लाकडी भांड्यापासून तयार केलेल्या पखवाजाची निर्मिती झालेली दिसून येते. म्हणजेच पखवाजाचा निर्मितीचा आधार हा मृदंग आहे असे लक्षात येते. आचार्य भरत कालीन निर्मिती त्रिपुष्कर वाद्य हे तीन अंगा पासून तयार झालेले दिसून येते यात अंकीक, आलिंग्य आणि उर्ध्वक हे होते. यामध्ये परिवर्तन होऊन कालांतराने मृदंग आणि नंतर पखवाजाची उत्पत्ती झालेली दिसून येते. रामचरित मानस मध्ये **'बाजत ताल पखवाज, बिना'** किंवा **'ताल मृदंग अनुपा तथा घंटा घंटी पखवाज आउज'** यासारख्या पंक्तीमध्ये पखवाजाचा उल्लेख झालेला दिसून येतो. याचा अर्थ असा होतो की पखवाज हा शब्द साधारणपणे चारशे पाचशे वर्षापूर्वी प्रचलित झालेला आहे. काही ऐतिहासिक वास्तु शिल्पांचा विचार केला असता असे लक्षात येते की बऱ्याच देवी. देवतांच्या हातामध्ये पखवाज सदृश्य वाद्य कोरलेले दिसते म्हणजे दुसऱ्या बाजूने याचा अर्थ असा होतो की पखवाज वाद्य प्राचीन आहे. जरी त्यामध्ये बदल होत गेले तरी त्याचे अस्तित्व मात्र पुरातन

असताना दिसून येते. वेगवेगळ्या संगीत तज्ञांच्या मते वेगवेगळे मतप्रवाह दिसून येतात. पखवाजाचे शिरोमणी पंडित पागल दास यांच्या मते पखवाज हे वाद्य प्राचीन आहे. जरी यापूर्वी त्यास मृदंग म्हणून संबोधले जात होते तरी देखील वर्तमान स्थिती मध्ये जे पखवाजवादक आहेत त्यांना पखवाजाचार्य न म्हणता मृदंगाचार्य म्हणून संबोधले जाते या तर्का वरुन असे लक्षात येते की मृदंग हे पुरातन आहे आणि पखवाज हे वाद्य मृदंगाचे परिवर्तीत रूप आहे.

पखवाजाच्या विकासाच्या संदर्भात विचार केला असता काही तथ्ये समोर येतात. पखवाजाच्या विकासाच्या प्राथमिक अवस्थेमध्ये पखवाजाला देवाश्रय आणि राजाश्रय प्राप्त होते, त्यानंतर घराण्यांची उत्पत्ती झाली दिसून येते. देवाश्रय आणि राजाश्रयाच्या काळात कलावंत निश्चिंतपणे साधना करत होते. यानंतर वेगवेगळी घराने संगीत उपासनेच्या माध्यमातून पखवाजाच्या विकासा करिता प्रयत्नशील राहिले. यामध्ये प्रामुख्याने पं. नानासाहेब पानसे, पं. स्वामी पागल दास, पं. राजा छत्रपती सिंह, पं. कदुऊ सिंह, पं. पुरुषोत्तम दास पखवाजी, पं. गोविंदराव बऱ्हाणपूरकर, पं. बाबुराव डवरी, पं. शंकर बापू आपेगावकर यासारख्या सर्वोच्च पखवाज वादकांनी राज दरबारात संगीत साधना केली त्याबरोबरच मंदिरामध्ये भजन, किर्तन यासोबत साथ-संगत केली आणि पखवाजला लोकप्रसिद्धी दिली. वेगवेगळ्या घराण्यांचे अनेक शिष्योत्तम तयार झाले आणि तेही वर्तमान स्थितीत पखवाजाचा प्रचार-प्रसार करत आहेत.

पखवाजाचे स्वरूप किंवा रचना:

पखवाज हे वाद्य त्याची रचना आणि स्वरूपामुळे पखवाज सदृश वाद्यापेक्षा वेगळे ठरते आणि त्यामुळे पखवाजाची रचना, पखवाजाचे बोल यामुळे पखवाजाचा बाज देखील वेगळा असताना दिसून येतो. पखवाजाचा बाज हा धीर गंभीर स्वरूपाचा असून सर्वसाधारणपणे भक्ती रस प्रधान आहे.

बोटांची नावे

पखवाजाचे वर्ण किंवा बोल:

एकल बोल

उजव्या हाताने वाजवण्याचे बोल

१. ता: ता हा बोल उजव्या हाताने करंगळी च्या साह्याने वाजविण्यात येतो. यामध्ये अनामिका, मध्यमा आणि तर्जनी हे तीनही बोट हवेमध्ये असतात. तर करंगळी आणि पंजाचा उभा भाग याचा वापर होतो. हा बोल आस युक्त आहे. ता हा बोल वाजवताना पंजा हा पूर्णपणे शायीवर असतो.

२. ति: उजव्या हाताच्या करंगळी, अनामिका, मध्यमा या तीन बोटाने एकत्रितपणे शायीच्या मध्यभागी दाबून आघात केला जातो. यावेळी तर्जनी ही हवेमध्ये असते.

३. ट/र/त: उजव्या हाताच्या तर्जनीने शायीच्या मध्यभागी दाबून आघात केला जातो यावेळी करंगळी, अनामिका, मध्यमा हि बोटे हवेत असतात.

४. दिं/म: वाजवताना करंगळी, अनामिका, मध्यमा आणि तर्जनी म्हणजेच पूर्ण पंजाने, पुडी वर उजव्या हाताने खुला आघात करण्यात येतो. हा स्वर खुल्या स्वरूपाचा किंवा युक्त असताना दिसून येतो.

५. तीं: तीं हा बोल वाजवताना अनामिका चे पहिले पेरे हे शायी वर स्थिर झालेले असते तर करंगळी, अनामिका, मध्यमा आणि तर्जनी हे हवेत असतात तर्जनीने लवेवर हलका आणि खुला आघात करण्यात येतो.

६. ना: ना हा बोल वाजवताना करंगळी, मध्यमा, तर्जनी हे हवेत असतात तर अनामिका हे बोट शायीवर हलकेच स्थिर असते आणि तर्जनी द्वारे चाटेवर वर दाबून आघात करण्यात येतो.

डाव्या हाताने वाजवण्याचे बोल

७. गे/घे/धु : गे/घे/धु हा बोल वाजवताना डाव्या हाताने धूमावर खुल्या हाताने आघात करण्यात येतो.

८. क/के/की/कत्त: डाव्या हाताने धूमावरती चोपून आघात करण्यात येतो.

संयुक्त बोल

९. धा: पुडी वर उजव्या हाताने ता वाजवून त्याच वेळेस धूमाच्या बाजूने गे किंवा घे वाजून धा हा बोल वाजवण्यात येतो.

१०. धिं: उजव्या हाताने पुडी वर तीं वाजून त्याच वेळेस धुमावर गे वाजले असता धिं हा बोल तयार होतो.

११. धि: हा बोल उजव्या हाताने पुडी वर वाजविण्यात येतो. हा बोल वाजवताना उजव्या हाताच्या पंजाचा करंगळी कडील भाग पूर्णपणे पुडी वर ठेवून तिरका उभा आघात केला जातो शायी पूर्ण झाकली जाते. याच वेळेस डाव्या हाताने धि वाजविण्यात येतो.

१२. र: हा बोल उजव्या हाताने पुडी वर वाजविण्यात येतो. हा बोल वाजवताना उजव्या हाताच्या पंज्याचा अंगठ्या कडील मांसल भागाचा आघात केला जातो. शायी पूर्ण झाकली जाते.

वर दिलेल्या क्रमानुसार वेगवगळ्या बोल रचना तयार होतात.

तिरकीट, तीटकत, किटतक, धुमकीट, घिंSतिरकीट, ताSतिरकीट, धाSतिरकीट, धिरधीर इत्यादी बोल वाजवले जातात.

प्रकरण २. तालातील संकल्पना

संगीतामध्ये गायन वादन कलेला साथसंगत म्हणून पखवाज आणि तबला या ताल वाद्यांचे अनंन्यसाधारण महत्व असताना दिसून येते. ताल वाद्याच्या संदर्भात काही महत्वाच्या संकल्पना स्पष्ट होणे महत्वाचे आहे. यासाठी काही महत्वाच्या संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. संकल्पनांच्या स्पष्टतेमुळे प्रात्यक्षिक गायन, वादन, नृत्य प्रभावी होण्यास मदत होते.

१) **संगीत :** गायन, वादन, नृत्य यांचा एकत्रित समावेश असलेल्या कलेस संगीत म्हणतात.

२) **नाद:** वस्तूवर आघात झाल्यावर ध्वनि लहरी निर्माण होतो त्यास नाद म्हणतात.

३) **स्वर:** नियमित कंपनसंख्या, उच्चनीचता, जडता आणि जाती अशा गुणधर्मानी युक्त आणि गायन वादनास उपयुक्त ठरणाऱ्या किंवा संगीतोपयोगी ध्वनीस किंवा नादास स्वर म्हणतात.

४) **लय :** गतीच्या नियमित पुनरावृत्तीस लय असे म्हणतात. तालाच्या संदर्भात वादनाची सातत्यपूर्ण विशिष्ट गती म्हणजे लय होय. सर्वसाधारणपणे लयीचे चार प्रकार पडतात.

१) विलंबित लय - अतिशय संथ गती २) मध्य लय - मध्यम गती.

३) द्रुत लय - जलद गती. ४) अतिद्रुत लय - अतिशय जलद गती.

५) **मात्रा :** ताला मध्ये काल (वेळ) मोजण्याच्या साधनास मात्रा म्हणतात. मात्रा अंकात मोजतात. सर्व मात्रांतील कालांतर समान असणे गरजेचे असते.

६) **बोल:** पखवाजावर पुडी आणि धुम किंवा तबला डग्यावर वाजविलेल्या विविध अक्षर समूहास बोल म्हणतात.

७) ताल: संगीतामध्ये विशिष्ट बोल, मात्रा, सम, काल, खंड आदींनी युक्त रचनेला ताल असे म्हणतात. थोडक्यात, संगीतामध्ये कालमापनासाठी ठराविक मात्रांत नियमबद्ध स्वरुपांत केलेल्या पखवाज किंवा तबल्याच्या रचनेला ताल म्हणतात.

८) ठेका: तालाच्या मूळ अक्षरांना ठेका म्हणतात.

९) सम: तालाच्या पहिल्या मात्रेस किंवा अक्षरास सम म्हणतात.

१०) काल: हवेत दर्शविण्यात येणाऱ्या मात्रेस काल म्हणतात. सर्वसामान्यपणे तालाच्या उत्तरार्धात येणाऱ्या पहिल्या मात्रेस किंवा अक्षरांस काल म्हणतात. कांही तालांत काल वेगवेगळ्या मात्रेवर असतात.

११) टाळी: तालाचा ठेका किंवा बोलसमूह म्हणताना ठराविक मात्रांवर जी टाळी वाजवितात तिला टाळी असे म्हणतात. **सामान्यत: समेवर पहिली टाळी असते, तसेच काल वगळता खंडाच्या पहिल्या मात्रेवर टाळी असते.**

१२) विभाग किंवा खंड: सम, काल आणि टाळी यांना अनुसरून तालाचे जे वेगवेगळे भाग पडतात त्यास विभाग किंवा खंड म्हणतात. **खंडामुळे तालाची जाती आणि वजन लक्षात येते.**

१३) आवर्तन : तालाच्या विशिष्ट चक्राकार गतीस आवर्तन म्हणतात.

१४) भरणा: ठेक्याच्या मूळ अक्षरांबरोबर काही अक्षरांचा उपयोग करून किंवा मूळ बोलात थोडा बदल करून जेव्हां तालाचा ठेका वाजवितात तेव्हां त्यास भरणा म्हणतात. विलंबित लयीत ठेका वाजविताना दोन मात्रांतील कालांतर किंवा वेळ भरून काढण्यासाठी भरण्याचा उपयोग होतो. यामुळे तालाचे सौंदर्य वाढून रंजकता निर्माण होते. बऱ्याच वेळेस वादकाकडून स्वतंत्र ताल वादनात उपजत किंवा साथ संगत करताना गायन-वादनास अनुसरून भारानायुक्त ठेका वाजवण्यात येतो.

१५) तुकडा : तालात वाजविल्या जाणाऱ्या छोट्या मोठ्या बोल समूहास तुकडा असे म्हणतात. तुकडा हा गायन वादनात रंजकता निर्माण करून समेला जोडण्याचे कार्य करतो.

१६) मुखडा : सर्व सामान्यपणे मुखडा हा तालाच्या मुखापासून (समे पासून) सुरु होतो. समेपूर्वी वाजविण्यात येणाऱ्या आकर्षक बोल समूहास मुखडा असे म्हणतात.

१७) मोहरा : समेपासून समेपर्यंत अथवा कालापासून समेपर्यंत वाजविण्यात येणाऱ्या आकर्षक बोल समूहास मोहरा असे म्हणतात.

१८) तिहाई : असा बोल समूह कि जो, एका आवर्तनात तीनदां वाजवून तिसरा 'धा' वर सम येतो त्यास तिहाई असे म्हणतात.

१९) बराबर किंवा एकपट : ठेक्याच्या एका मात्रेत एक मात्रा म्हटली किंवा वाजविली तर त्यास बराबर किंवा एकपट असे म्हणतात.

२०) निमपट : संतुलन ठेऊन दोन मात्रेत एका मात्रा म्हटली किंवा वाजविली तर त्यास निमपट म्हणतात.

२१) सव्वापट : संतुलन ठेऊन चार मात्रेत पाच मात्रा म्हटली किंवा वाजविली तर त्यास सव्वापट म्हणतात.

२२) दीड पट किंवा आड लय : संतुलन ठेऊन दोन मात्रेत तीन मात्रा म्हटली किंवा वाजविली तर त्यास दीडपट म्हणतात.

२३) दुगून (दुप्पट) : संतुलन ठेऊन ठेक्याच्या एका मात्रेत दोन मात्रा म्हटली किंवा वाजविली म्हणजे त्यास दुगून किंवा दुप्पट असे म्हणतात.

२४) तिगून किंवा तिप्पट: संतुलन ठेऊन ठेक्याच्या एका मात्रेत तीन मात्रा म्हटली किंवा वाजविली तर त्यास तिगून किंवा तिप्पट असे म्हणतात.

२५) चौगून किंवा चौपट: संतुलन ठेऊन ठेक्याच्या एका मात्रेत चार मात्रा म्हटली किंवा वाजविली तर त्यास चौगून किंवा चौपट असे म्हणतात.

२६) किस्म किंवा प्रकार: ठेक्यातील मूळ अक्षरांचा उपयोग करून त्या सोबत विशिष्ट बोल ठरून ठेक्याचे जे विविध प्रकार वाजवितात त्यास किस्म किंवा प्रकार असे म्हणतात.

२७) लग्गी : केरवा, दादरा, अद्धा किंवा दीपचंदी तालांत वाजविल्या जाणाऱ्या आकर्षक किंवा नजाकतदार बोल समूहास लग्गी म्हणतात. बऱ्याच वेळा लग्गी दुगून, चौगुन लयकारीत आणि तिचे निरनिराळे प्रकार करून वाजविली जाते. लग्गीचा उपयोग विशेष करून साथसंगतीसाठी केला जातो. लग्गी मुळे वादनात रंजकता निर्माण होऊन रस निर्मिती होते.

२८) उठान: ताल आवर्तनात वेगवेगळे वादन प्रकार सुरू करण्याआधी वादनास भारदस्तपणा किंवा उठाव येण्यासाठी जो आकर्षक बोलसमूह वाजवितात त्यास उठान म्हणतात. लग्गी वादन सुरू करण्यापूर्वी देखील वाजविल्या जाणाऱ्या छोट्या बोल समूहास उठान म्हटले जाते.

२९) पलटा: कायदा, रेल्याला जोडून मूळ कायदा किंवा रेल्यातील बोलांचाच उपयोग करून ज्या संतुलित आणि आकर्षक रचना तालाच्या स्वरुपास अनुसरून वाजविल्या जातात त्यास पलटे असे म्हणतात.

३०) रेला: स्वतंत्र पखवाज आणि तबला वादनात चौपट किंवा आठपट करून अतिशय तयारीत जी रचना वाजविली जाते तिला रेला म्हणतात. एका अक्षर समूहाचा ओघ आणि वेग तसेच पुडी आणि धूम तसेच तबला डग्ग्यावरील अक्षरांची आस आणि सुंदर मिलाफ ही रेल्याची वैशिष्ट्ये आहेत. सर्वसामान्यपणे रेला हा धावत्या बोलांची नियमबद्ध रचना असते.

३१) परण: खुल्या बोलांची, तिहाईयुक्त आणि तालाच्या कमीत कमी दोन-तीन आवर्तनांत वाजविल्या जाणाऱ्या आकर्षक बोल रचनेला परण म्हणतात. परण या रचनेत जोरकस बोलांचा समावेश होतो.

३२) जाती: तालाच्या विभागात दोन मात्रांमधील कालांतराचे कमी-अधिक बोलांच्या उपयोगाने जी विशिष्ट रचना निर्माण होते त्यास जाती म्हणतात.

अ) तिस्त्र : सर्वसामान्यपणे तीन-तीन मात्रांच्या खंडास तिस्त्र जातीचा ताल म्हणतात **उदा.** दादरा. तसेच जाती मूळ तालाच्या एका मात्रेत ३-६-१२ मात्रा या पद्धतीने वाजविल्या जाणाऱ्या बोल समूहांच्या लयकारीस तिस्त्र जाती म्हणतात.

ब) चतस्त्र : सर्वसामान्यपणे चार चार मात्रांच्या खंडास चतस्त्र जातीचा ताल म्हणतात. **उदा.** तीनताल किंवा आदिताल. किंवा जाती मूळ तालाच्या एका मात्रेत ४-८-१६ मात्रा या पद्धतीने वाजविल्या जाणाऱ्या बोल समूहांच्या लयकारीस चतस्त्र जाती असे म्हणतात.

क) मिश्र : सर्वसामान्यपणे तालाची अशी रचना की ज्यामध्ये वेगवेगळ्या खंडात कमी अधिक मात्रांचा समावेश होतो त्यास मिश्र जातीचा ताल म्हणतात. किंवा तालातील वेगवेगळ्या मात्रेत कमी अधिक बोलांचा समावेश होतो त्यास मिश्र जाती म्हणतात. **उदा.** धमार.

३३) लेहरा : स्वतंत्र पखवाज आणि तबला वादनासाठी एखाद्या स्वर वाद्यावर विशिष्ट तालासाठी आणि रागामध्ये लयबद्ध स्वरसमूह सातत्यपणे किंवा चक्राकार वाजविला जातो त्यास लेहरा असे म्हणतात. लेहरा हा कालमापनाचे साधन आहे.

३४) तालाचे दश प्राण : ज्याप्रमाणे मानवी शरीरामध्ये वेगवेगळे अवयव आहेत या सर्वांच कार्यान्वयन हे प्राणच्या माध्यमातून होते. म्हणजेच प्राणाशिवाय शरीर हे निर्जीव आहे. प्राचीन काळातील विद्वानांनी किंवा संगीततज्ञांनी तालामध्ये १० प्राणांचा समावेश असणे महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन केले आहे. यासंदर्भात नारद यांनी लिहिलेल्या **'संगीत मकरंद'** यामध्ये तालाच्या दहा प्राण यांचा उल्लेख आढळून येतो. यामध्ये **१. काळ, २. मार्ग, ३. क्रिया (सशब्द, नि: शब्द), ४. अंग, ५. ग्रह (सम ग्रह, विषम ग्रह) ६. जाती, ७. कला, ८. लय ९. यती १०. प्रस्तार** यांचा समावेश होतो. तालाच्या १० प्राणांचा उपयोग दक्षिण भारतीय म्हणजेच कर्नाटकी संगीतामध्ये विशेषत्वाने होताना दिसून येतो.

काल: काल या शब्दाची व्याप्ती अतिशय विस्तारित असताना दिसून येते. म्हणजे वेळ म्हणून देखील ओळखली जाते. या संकल्पने अंतर्गत श्रुष्टीच्या उत्पत्तीपासून ते अंतापर्यंत

किंवा शेवटापर्यंतचा कालावधी समाविष्ट होतो. वर्तमान स्थिती मध्ये काल मापनासाठी आपण सेकंदा पासून ते वर्षापर्यंतचा उपयोग करतो. परंतु संगीत क्षेत्रामध्ये निमिष म्हणजेच पापणी लावण्यासाठी जेवढा कालावधी लागतो, त्याचादेखील विचार करण्यात आलेला आहे. या निमिषाचे विभाजन **कला, चतुभाग, अनुद्रुत, द्रुत, लघु, गुरु, प्लूप्त, काकपद** या भागात केलेले आहे.

मार्ग: तालाच्या पहिल्या मात्रे पासून ते शेवटच्या मात्रे पर्यंत जी चक्राकार अवस्था आहे त्यास मार्ग असे म्हणतात. या अंतर्गत टाळी, काल, सम, खंड या गोष्टींचा समावेश होतो. सनातनवादी संगीतज्ञ ध्रुव, चित्र, वार्तिक, आणि दक्षिण या चार मार्गाच्या प्रकारांना मानत होते.

क्रिया: एखादे कार्य करण्याच्या प्रक्रियेला क्रिया असे म्हणतात. **ताल वाद्यामध्ये हाताच्या आघातास किंवा एखाद्या विशिष्ट दिशेला हात दर्शवाण्याच्या पद्धतीला क्रिया असे म्हणतात.** सम किंवा ताळीही हातावर हात आघात करून दर्शविली जाते. तर काल हा हात हवेत, एक बाजूला करून दर्शविला जातो. क्रियेचे **सशब्द** आणि **निशब्द** असे दोन प्रकार पडतात. सशब्द क्रियेमध्ये टाळी देणे यांचा समावेश होतो. याचे चार भाग आहेत **ध्रुवा, सम्यक, ताल आणि सन्निपात.** निशब्द क्रियेमध्ये उजव्या हाताने एका बाजूला हात झुकून मात्रांचे मोजमाप होते. उदाहरणार्थ काल दाखवताना हात उजव्या बाजूला हवेत दाखवला जातो याला निशब्द क्रिया म्हणतात.

अंग: ज्याप्रकारे उत्तर भारतीय संगीतामध्ये ताल पद्धतित खंड वापरले जातात त्याच प्रकारे दक्षिण भारतीय संगीत पद्धतीमध्ये अंग ही संकल्पना वापरली जाते. प्रत्येक तालाचे वेगवेगळे खंड असतात. त्याच प्रकारे दक्षिण भारतीय संगीतामध्ये सहा प्रमुख अंगाचा उपयोग होतो. यामध्ये **अनुदत्त, द्रुत, लघु, गुरु, प्लूक्त, काकपद** यांचा समावेश होतो.

ग्रह: ज्या मात्रेपासून एखादी बंदिश सुरू होते त्या ठिकाणाला ग्रह असे म्हणतात. तालाच्या वेगवेगळ्या बंदिशी सर्वसामान्यपणे समेपासून सुरु होतात, तर काही रचना या कालपासून किंवा वेगवेगळ्या मात्रेपासून सुरु होतात. ग्रहांचे सर्वसामान्यपणे दोन प्रकार

पडतात यामध्ये **समग्रह** आणि **विषमग्रह** यांचा सामावेश होतो. समग्रह म्हणजे तालाच्या पहिल्या मात्रे पासून सुरु होणारी रचना होय. तर विषमग्रह म्हणजे समेपासून एखाद्या रचनेची सुरुवात न होता एखाद्या वेगळ्या मात्रेपासून रचनेची सुरुवात होते त्यास विश्रामग्रह असे म्हणतात. विषम ग्रहाचे दोन प्रकार पडतात एक म्हणजे **अतित ग्रह** आणि दुसरे म्हणजे **अनागत ग्रह.** अतीत ग्रह म्हणजे एखादी रचना सुरू झाल्यानंतर ज्यावेळेस ताल सुरू होतो, तर अनागत ग्रह म्हणजे सम येण्यापूर्वीच एखाद्या रचनेची सुरुवात होते त्यास अनागत ग्रह म्हणतात.

जाती: जातीवरून तालाच्या रचनेची वैशिष्ट्य लक्षात येते. खंडातील मात्रांची संख्या बदलल्यामुळे त्याचे वजन देखील बदलते. जातीचे पाच प्रकार आहेत. यामध्ये तिस्त्रजाती, चतुरस्तजाती, खंडजाती, मिश्रजाती आणि संकीर्णजाती.

कला: अक्षर किंवा काळाच्या विभाजनाला कला असे म्हणतात. एक अक्षर काळामध्ये किती बोल वाजवली जातात किंवा किती स्वर गायले जातात याला कला म्हणतात.

लय: संगीत विषयांमध्ये दोन मात्रातील अंतरास किंवा काळाच्या समान गतीला लय असे म्हणतात. ही लय दोन मात्रातील विश्रांती असते. लय संगीताचा आधार आहे. लयी चे सर्वसामान्यपणे **विलंबित लय, मध्य लय आणि द्रुत लय** असे तीन प्रकार पडतात.

यती: तालाची किंवा एखाद्या रचनेचा लयीनुसार जो गतीचा गुणधर्म आहे त्यास यती असे म्हणतात. यतीचे सर्वसामान्यपणे पाच प्रकार पडतात **समा यती, श्रोतागता यती, मुदुंगा यती, गोपुछां यती आणि पिपीलिका यती**.

प्रस्तार: तालाच्या स्वरूपानुसार वेगवेगळ्या प्रकारे विस्तार करण्यात येतो त्यास प्रस्तार असे म्हणतात. या अंतर्गत कायदा, पेशकार, रेला यांचा पलट्यांच्या आधारे विस्तार करण्यात येतो त्यास प्रस्तार असे म्हणतात.

प्रकरण ३. ताल लिपी

तालातील बोल, मात्रा, सम, काल, खंड आणि टाळ्या यांना चिन्हांसहित लिहिणे म्हणजेच ताल लिपीबद्ध करणे होय. ताल लिपीबद्ध करण्यावरून तालाच्या प्रत्येक मात्रेतील लयकारी लक्षात येते. ताल लिपीच्या पं. भातखंडे ताल लिपी पद्धत आणि पं. पलुस्कर ताल लिपी पद्धत अशा दोन पद्धती प्रचलित असताना दिसून येतात.

पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर

(१८ मे १९२१ - २५ ऑक्टोबर, १९५५)

घटक	पं. पलुस्कर लिपी
सम	१ आकडा
काल	+ चिन्ह
	उदा: धा धि ना । धा तू ना । १ २ ३ । ४ ५ ६ । १ +
एक मात्रा	- - - - चिन्ह उदा: धा धि ना । धा तू ना । १ - - -|+ - -
विभाग	संपूर्ण ताल झाल्यावर ।
एका मात्रेत एकाहून जास्त अक्षरे	चिन्ह नाही
टाळ्या	१.२.३ अंक
थांबायचे अंतर	S

१/२ मात्रा	धागे ००
१/४ मात्रा	ति र की ट
१/८ मात्रा	ति ट क ता ग दि ग न
१/3 मात्रा	धातीट WWW
१/६ मात्रा	धातीटतातीट WWWWWW WWWWWW

उदा. चौताल

धा	धा	दिं	ता	तिट	धा	दिं	ता	तिट	कता	गदी	गन|
-	-	-	-	००	-	-	-	००	००	००	००
१		×		२		×		३		४	

पंडित विष्णू नारायण भातखंडे

(१० ऑगस्ट १८६० – १९ सप्टेंबर १९३६)

घटक	भातखंडे लिपी
सम	चिन्ह x
काल	चिन्ह ०
	उदा: धा धि ना । धा तू ना ॥ १ २ ३ । ४ ५ ६ ॥ × ०
एक मात्रा	मात्रे खाली आकडा लिहिणे
विभाग	। उभी रेघ
एका मात्रेत एकाहून जास्त बोल	तिरकिट
टाळ्या	१.२.३ अंक
थांबायचे अंतर	S
१/२ मात्रा	धाS

उदा. चौताल

धा धा| दिं ता| तिट धा| दिं ता| तिट कता| गदी गन ||

× ० २ ० ३ ४

प्रकरण ४. लय आणि लयकारी

दोन क्रियांमधील जी विश्रांती व कालांतराने होणारी त्याची पुनरावृत्ती म्हणजे लय होय. पण मात्रांच्या मध्ये कमी अधिक बोलांची रचना करून वादन केल्यास त्या वादनास एक आकर्षक रूप किंवा वजन प्राप्त होते. त्यामुळे संगीत खुलते म्हणजेच रस निर्मिती होते, त्यास लयकारी म्हणतात. नुसत्या ठेक्याने कालमापन जाते व लय सांभाळली जाते, परंतु नुसत्या ठेक्याऐवजी कमी अधिक बोलांचा ठेक्यामध्ये उपयोग केल्यास ते वादन लयकारी युक्त होते व ते प्रभावी ठरते आणि रस निर्मितीस पूरक ठरते. ठेक्याचे प्रकार, भरणायुक्त ठेका, छोटे-मोठे तुकडे, लग्गीबाज वादन करून विविध तऱ्हेने वादन, नृत्य, गायन खूप आकर्षक ठरते.

लय: गतीच्या सातत्यपूर्ण पुनरावृत्तीस लय असे म्हणतात. तालाच्या संदर्भात वादनाची सातत्यपूर्ण विशिष्ट गती म्हणजे लय होय. सर्वसाधारणपणे लयीचे चार प्रकार पडतात.

१) विलंबित लय - अतिशय संथ गती २) मध्य लय - मध्यम गती.

३) द्रुत लय - जलद गती. ४) अतिद्रुत लय - अतिशय जलद गती.

लयकारी: विशिष्ट लयीच्या आधारावर किंवा विशिष्ट लय कायम ठेऊन कमी अधिक बोलांची योजना किंवा वापर करून वादन केल्यास त्या वादनास एक अलंकारिक स्वरूप प्राप्त होते. त्यामुळे संगीत खुलते त्यास लयकारी म्हणतात. **म्हणजे लय हि संकल्पना लयकारी पेक्षा विस्तारित आहे.** लय हा लयकारीचा आधार असताना लक्षात येतो.

उदा : ताल : दादरा ठेका

धा धि ना । धा तू ना ॥

१ २ ३| ४ ५ ६॥

× o

असा न वाजविता लयकारी युक्तपणे खालील प्रमाणे वाजवता येतो.

धातीत् धाधा धिना। धातीत् धाधा तीना ॥

× o

सर्वसाधारणपणे प्रत्येक तालाच्या अकरा लयकारीत रूपांतर करता येते.

१. दुप्पट, **२.** तिप्पट, **३.** चौपट, **४.** पाउणपट (४:३),

५. ३:४, **६.** कुआडी ४:५, **७.** ५:४, **८.** आडी २:३

९. ३:२ **१०.** बिआडी ४:७, **११.** ७:४.

आडी, कुआडी व बिआडी या लयींच्या दुपटीस अनुक्रमे महाआडी, महाकुआडी व महाबिआडी असे संबोधले आहे.

*** ताल लिपीबद्ध करताना आकड्यां (१,२,३...) ऐवजी बोल लिहावेत.**

एकपट: १ २ ३ ४ ५ ६

दुप्पट : १,२ ३,४ ५,६ १,२ ३,४ ५,६

तिप्पट: १,२,३ ४,५,६ १,२,३ ४,५,६ १,२,३ ४,५,६

चौपट: १,२,३,४ ५,६,१,२, ३,४,५,६,

१,२,३,४ ५,६,१,२ ३,४,५,६,

आडलय: (३÷२ किंवा ६÷४)

१S२	S३S	४S५	S६S
धाSधिं	SनाS	धाSति	SनाS

पाऊनपट: **(३÷४)** १SS S२S SS३ SSS ४SS S५S SS६ SSS

(४÷३): १SS२ SS३S S४SS ५SS६ SSSS

कुआड: **(५÷४)** १SSS२ SSS३S SS४SS S५SSS ६SSS७

(४÷५) १SSS S२SS SS३S SSS४ SSSS ५SSS S६SS SS७S

बीआड: **(४÷७)** १SSS२SS S३SSS४S SS५SSS ६SSS७S

(४÷७) १SSS SSSS २SSS SSSS ३SSS SSSS ४SSS SSSS

प्रकरण ५. ओळख तालांची

१. तेवरा

२. सुलताल

३. चौताल

४. धमार

५. आदिताल

६. गजझंपा

७. शिखर ताल

८. बसंत

९. रुद्र

१०. मत्ततात

११. गणेश ताल

धमार ताल धमार गायनासाठी, तर इतर तालांचा उपयोग धृपद, स्वतंत्र पखवाज वादन तसेच स्वर वाद्यांच्या साथ संगतीस होतो.

१. तेवरा ताल

मात्रा: ७ खंड: ३ सम: १ ल्या मात्रेवर काल: नाही

टाळी: ४, ६ व्या मात्रेवर

पं. पलुस्कर लिपी	धा	दिं	ता	तिट	कता	गदी	गन|
	-	-	-	००	००	००	००
	१			२		३	
पं. भातखंडे लिपी	धा	दिं	ता|	तिट	कता|	गदी	गन‖
	×			२		३	

२. सुलताल

मात्रा: १०, खंड: ५, सम: १, काल: ३,९ मात्रेवर टाळी: १, ५, ७ मात्रेवर

धा	धा|	दिं	ता|	तिट	धा|	तिट	कता|	गदी	गन||
×		०		२		३		०	

३. चौताल ताल

मात्रा: १२ खंड: ६ सम:१ मात्रेवर, काल: ३, ७ मात्रेवर, टाळी: ५, ९, ११ मात्रेवर

धा	धा|	दिं	ता|	तिट	धा|	दिं	ता|	तिट	कता|	गदी	गन||
×		०		२		०		३		४	

४. धमार ताल मात्रा: १४, खंड: ४, सम:१ मात्रेवर, काल:८ मात्रेवर, टाळी: ६, ११ मात्रेवर

क धि ट धि ट| धा S| क ति ट| ति ट ता S||
× २ ० ३

५. आदिताल

मात्रा: १६ खंड: ४ सम: १ मात्रेवर, काल: ९ मात्रेवर, टाळी: ५, १३ मात्रेवर

धा धिट धिट धा| धा धिट धिट धा| कत् तिट तिट ता| तिट कता| गदी गन||
× २ ० ३

६. गजझंपा ताल मात्रा: १५ खंड:४ सम:१ मात्रेवर काल:९ मात्रेवर टाळी: १, ५, १२ मात्रेवर

धा धिं नक तक| धा धिं नक तक| तिं नक तक| तिट कता गदी गन||
× २ ० ३

७. शिखर ताल

मात्रा: १५ खंड:५ सम: १ मात्रेवर काल: नाही, टाळी: १, ५, ९, १२, १४ मात्रेवर

धा त्रक धिं नक| थुं गा धिं नक| धुम किट तक| धेत धा| तिट कता गदी गन||
× २ ३ ४ ५

८. बसंत ताल

मात्रा: ९ खंड: ९ सम: १ काल: ५, ७, ९ मात्रेवर

टाळी:१, २, ३, ४, ८ मात्रेवर

धा| दिं| ता| धेत| ता| तिट| कत| गदी| गन||

× २ ३ ४ ० ५ ० ६ ०

९. रुद्र ताल

मात्रा: ११ खंड: ११ सम:१ मात्रेवर, काल: २, ६, ११ मात्रेवर, टाळी: १, ३, ४, ५, ७, ८, ९, १० मात्रेवर

धा| तत्त| धा| तिरकिट| धि| ना| तिरकिट| तू| ना| कत्त| ता|

× ० २ ३ ४ ० ५ ६ ७ ८ ०

१०. मत्ततात

मात्रा: १८ खंड: ९ सम:१ मात्रेवर, काल: २, ६, ११ मात्रेवर, टाळी: १, ३, ४, ५, ७, ८, ९, १० मात्रेवर

धा	S|	घी	ड|	न	ग|	घी	ड|	न	ग|	ति	ट|	क	त|	ग	दि|	ग	न||
×		०		२		३		०		४		५		६		०			

११. गणेश ताल

मात्रा: १८ खंड: ५ सम:१ मात्रेवर, काल: १५ मात्रेवर, टाळी: १, ३, ४, ५, ७, ८, ९, १० मात्रेवर

धा	S	धि	ट|	धि	ट	धा	S|	धा	S	कि	ट|	त	क|	ग	दि	ग	न||
×				२				३				०		४					

ताल विस्तार

चिन्ह टायपिंग अडथळ्यामुळे तालांच्या रचनेत केवळ खंडाच्या चिन्हाचा वापर केला आहे, **मुळ ताल टाईप करताना सर्व चिन्हे वापरली आहेत**, यास अनुसरून ताल किंवा तालातील एखादी रचना लिहिताना प्रत्येक आवर्तनास सर्व चिन्हे लिहावीत.

ताल: तेवरा

धा	दिं	ता |	तिट	कता|	गदी	गन ||
×			२		३	

प्रकार /किस्मे

धा	दिं	Sता |	तिट	कता|	गदी	गन ||
धा	दिंदिं	ता |	तिट	कता|	तिटकता	गदीगन ||
धा	दिं	Sता |	Sधा	Sता|	तिटकता	गदीगन ||
धा	दिंदिंदिं	ता |	तिट	कता|	गदी	गन ||
धा	दिं दिं	ता |	तिट	कता|	गदी	गन ||

उठान

धागेतिट तागेतिट कडधातिट | धागेतिट कडधेत्तान | धा धातिरकीटताS ||
धीटधीट कत्धा न्धान| धाधा धीटधीट | धागेतिट कड्धातिट |
कत्धा न्धान धाकत् | धान्धान| धाकत् | धान्धान धाकत् ||
घेघे तिटतिट धागेतिट | तागेतिट कडधेत्तान | धा धाSतिरकिटतक|
तक्डाँ धा धाSतिरकिटतक| तक्डाँ धा| धाSतिरकिटतक तक्डाँ ||

परण

धीटधीट कडधातिट कडधातिट | कडधातिट धागेतिट| कड्धेत्तिरकिट कड्धेत्तिरकिट|
कड्धेत्तिरकिट कत्धातिर किटतक | तक्डाँ धात्| क्डाँधा त्क्डाँ||
धागेतिट गदिगन नगतिट | गदिगन धागेतिट| तागेतिट गदिगन||
धीटधीट धागेतिट गदिगन | नगतिट कड्धातिट | धागेतिट गदिगन |
नगतिट कड्धातिट गदिगन| धा गदिगन धा गदिगन ||

फरमाईश चक्रदार

दिंदिं	तिटतिट	धागेतिट |	तागेतिट	कडधातिट |	धागेतिट	कतधा |
कताSन	धा	धाधा |	कत्धा	कतधा |	कताSन	धा |
धाधा	कत्धा	कतधा |	कताSन	धा |	धाधा	कत्धा |
दिंदिं	तिटतिट	धागेतिट |	तागेतिट	कडधातिट |	धागेतिट	कतधा |
कताSन	धा	धाधा |	कत्धा	कतधा |	कताSन	धा |
धाधा	कत्धा	कतधा |	कताSन	धा |	धाधा	कत्धा |
दिंदिं	तिटतिट	धागेतिट |	तागेतिट	कडधातिट |	धागेतिट	कतधा |
कताSन	धा	धाधा|	कत्धा	कतधा|	कताSन	धा|
धाधा	कत्धा	कतधा|	कताSन	धा|	धाधा	कत्धा||

रेला

धागेतिट तागेतिट धागेतिट | नागेतिट गदिगन | नागेतिट गदिगन |

धागेतिटतागेतिट धागेतिटनागेतिट गदिगननागेतिट| गदिगनधागेतिट गदिगनधागेतिट| गदिगननागेतिट नागेतिटगदिगन||

विस्तार:.

धागेतिटतागेतिट धागेतिटगदिगन नागेतिटगदिगन| गदिगननागेतिट धागेतिटतागेतिट| गदिगननागेतिट गदिगनगदिगन||

धागेतिटगदिगन धागेतिटतागेतिट गदिगननागेतिट| घींSतिरकिटतक तासतिरकिटतक| घींSतिरकिटतक तासतिरकिटतक||

नागेतिटगदिगन नागेतिटगदिगन नागेतिटगदिगन| नागेतिटगदिगन नागेतिटगदिगन| नागेतिटगदिगन नागेतिटगदिगन||

धागेतिटगदिगन धागेतिटगदिगन धागेतिटगदिगन| धागेतिटगदिगन धागेतिटगदिगन| धागेतिटगदिगन धागेतिटगदिगन||

नागेतिटगदिगन नागेतिटगदिगन नागेतिटनागेतिट| नागेतिटगदिगन गदिगननागेतिट| नागेतिटगदिगन गदिगननागेतिट||

धाSतिटगदिगन नागेतिटगदिगन धाSतिटगदिगन| धाSतिटगदिगन नागेतिटनागेतिट| धाSतिटगदिगन नागेतिटनागेतिट|

नागेतिटगदिगन धाSSS नागेतिटनागेतिट नागेतिटगदिगन धाSSS| नागेतिटनागेतिट नागेतिटगदिगन||

तिहाई:.

धागेतिटगदिगन तागेतिटगदिगन धाSधागेतिट गदिगनतागेतिट गदिगनधाS| धागेतिटगदिगन तागेतिटगदिगन||

तुकडा

धीटधीट धागेतिट कडधातिट | धागेतिट कतिटत | गेनधेत्त धागेतिट |

तागेSन धाता धातागे | Sनधा ताधा | तागेSन धाता ||

धीटधीट धागेतिट कडधातिट | धागेतिट गदिगन | नागेतिट कडधातिट|

धागेतिट धा कडधातिट | धागेतिट धा | कडधातिट धागेतिट||

दिंदिं तिटतिट धागेतिट | तागेतिट कडधेत्तान | धा धाSतिरकिटतक |

तक्डाँ धा धाSतिरकिटतक| तक्डाँ धा | धाSतिरकिटतक तक्डाँ ||

ताल: आदीताल

धा	धिट	धिट	धा|	धा	धिट	धिट	धा|	कत्	तिट	तिट	ता|	तिट	कता	गदी	गन||
×				२				०				३			

उठान

धीटधीट	कत्धा	न्धान	धाधा|	धीटधीट	धागेतिट	कड्धातिट	धागेतिट|	कत्धा	न्धान	धा	कत्ता|	न्तान	ता	कत्धा	न्धान|
कत्धा	न्धान	धा	कत्ता|	न्तान	ता	कत्धा	न्धान|	कत्धा	न्धान	धा	कत्ता|	न्तान	ता	कत्धा	न्धान||
धीटधीट	धागेतिट	गदीगन	नागेतिट|	तकीटत	तिटकता	घेघेतीट	कताSन|	कताSन	धाधा	धाSSS	कताSन|	धाधा	धाSSS	कताSन	धाधा||

धेत्तधेत्त	त्तात्रक	धेत्तधेत्त	त्तात्रक|	धेत्तधेत्त	त्तात्रक	धेत्तधेत्त	त्तात्रक|
धेत्तSघे	SSधेत्त	तात्रक	धेत्तSघे|	SSधेत्त	तात्रक	धेत्तघे	SSधेत्त||

धा	धीट	धीट	धा|	कत्ता	घींघीं	धाघीं	घींधा|
दिंतिटतिट	दिंता	तिटतिटतिट	दिंता|	कित्ता	धातिटकताघीं	नकधातिट	किटघिनता||

परण

धागेतिट धागेतिट तागेतिट तागेतिट| कडधातिट धागेतिट गदीगन नागेतिट|
कतीटता गीनधा तिटकता गदीगन| धाSSS गदीगन धाSSS गदीगन ||
धागेतिट तागेतिट धागेतिट तागेतिट| कडधातिट धागेतिट गदीगन नागेतिट|
तकीटत गीनधा तिटकता गदीगन| धागेतिट कताSन कतीटता गदीगन||
धागेतिट गदीगन धाSSS धागेतिट| कताSन कतीटता गदीगन धागेतिट|
गदीगन धाSSS धागेतिट कताSन| कतीटता गदीगन धागेतिट कताSन||
धीटधीट धागेतिट गदीगन नागेतिट| कताSन धीत्ता तिटकता गदीगन|
धागेतिट कताSन कतीटता कताकता| कतीटता कताकता कतीटता गदीगन|
धाSSS कताSन कतीटता कताकता| कतीटता कताकता कतीटता गदीगन|
धाSSS कताSन कतीटता कताकता| कतीटता कताकता कतीटता गदीगन ||
धाSन धीकीट कतीट ताSन | तिट कडधाSन धादींता कत|
धाSS आSS धादींता धाSS| आSS धादींता कत धाSS ||
धागेतिट तागेतिट कडधातिट धागेतिट| कतीटता गीनधागे तिटकता गदीगन
तिरकीटतकताS तिटकतागदीगन धाधा तिरकीटतकताS| तिटकतागदीगन धाधा तिरकीटतकताS तिटकतागदीगन||

झुलणा परण (डगमगती लय)

धागेन धागेतिट तागेन तागेतिट| कडधेत्त धागेतिट कड्धातिट धागेतिट| कत्धा न्धान धा कत्ता| न्तान ता कत्धा न्धान|
कत्धा न्धान धा कत्ता| न्तान ता कत्धा न्धान| कत्धा न्धान धा कत्ता| न्तान ता कत्धा न्धान||

फर्माईश चक्रदार, रचना. लालजी श्रीवास्तव

नानाना	नगतिरकिट	कतेटेतेटे	कतागदिगन|	तेटेकताSन	किटधेSता	कतीSघेन	नाSकिटतक|
धातिरकिटधिकिट	कताकताकता	घेनानड़ाSन	धाSकत|	दींगिड़धाती	धाकतदींगिड़	धातीधकत	दींगिड़दाती|
धाSकत	दींगिड़धाती	धातकदींगिड़	धातीधकत|	दींगिड़दाती	धाSकत	दींगिड़धाती	धाकतदींगिड़|
धातीधकत	दींगिड़दाती	धा	नानाना|	नगतिरकिट	कततेतेटे	कतागदिगन	तेटेकताSन|
किटधेSता	कत्तीSघेन	नाSकिटतक	धातिरकिटधिकिट|	कताकताकता	घेननड़ाSन	धाSकत	दींगिधाती|
धातकदीगिड़	धाSकत	दींगिधाती	धाSकत|	दींगिधाती	धातकदीगिड़	धाSकत	दींगिधाती|
धाSकत	दींगिधाती	धातकदीगिड़	धाSकत|	दींगिधाती	धा	नानाना	नगतिरकिट|
कततेतेटे	कतागदिगन	तेटेकताSन	किटधेSता|	कत्तीSघेन	नाSकिटतक	धातिरकिटधिकिट	कताकताकता|
घेननड़ाSन	धाSकत	दींगिधाती	धातकदीगिड़|	धाSकत	दींगिधाती	दींगिधाती	धाSकत|
दींगिधाती	धाकतदींगिड़	धातीधाकत	दींगिड़धाती|	धाSकत	दींगिधाती	धाकतदींगिड़	धातीधाकत||

चक्रदार

(धाSन धिकिट धात्रक धिकिट कडधेत्त धिकिट दिनदि नाSSS

कत्तिट घेधेतीट धात्रक धिकीटकत् घींSतीरकीटतकताS घींSतीरकिटतक ताSSS घींSतीरकीटतक

ताSSS घींSतीरकीटतक ताSSS घींSतीरकीटतक ताSSS घींSतीरकीतटकत ताSSS घींSतीरकीटतकताS

घींSतीरकटतक ताSSS घींSतीरकीटकता) × 3

रेला

धातिरकिटतकताS धाSतिरकिटतक धिरधीरकिटतक ताSतिरकिटतक| धातिरकिटतकताS धिरधीरकिटतक धिरधीरकिटतक ताSतिरकिटतक|
ताSतिरकिटतक तिरतिरकिटतक तिरतिरकिटतक ताSतिरकिटतक| धातिरकिटतकताS धिरधीरकिटतक धिरधीरकिटतक ताSतिरकिटतक||

धातिरकिटतकताS धिरधीरकिटतक धातिरकिटतकताs धिरधीरकिटतक| धातिरकिटतकताS धिरधीरकिटतक धातिरकिटतकताS धिरधीरकिटतक|
ताSतिरकिटतक तिरतिरकिटतक ताSतिरकिटतक तिरतिरकिटतक| तातिरकिटतकताS धिरधीरकिटतक धातिरकिटतकताS धिरधीरकिटतक||

धातिरकिटतकताS ताSतिरकिटतकताS धातिरकिटतकताS ताSतिरकिटतकताS| धातिरकिटतकताS धिरधीरकिटतक धातिरकिटतकताS धिरधीरकिटतक|
ताSतिरकिटतकताS धातिरकिटतकताS ताSतिरकिटतकताS धातिरकिटतकताS धातिरकिटतकताS धिरधीरकिटतक धातिरकिटतकताS धिरधीरकिटतक|

तिहाई

धातिरकिटतकताS धिरधीरकिटतक धातिरकिटतकताs धिरधीरकिटतक| धाSS SSSS धातिरकिटतकताS धिरधीरकिटतक
धातिरकिटतकताs धिरधीरकिटतक| धाSS SSSS | धातिरकिटतकताS धिरधीरकिटतक धातिरकिटतकताs धिरधीरकिटतक||

ताल: चौताल

धा	धा|	दिं	ता|	तिट	धा|	दिं	ता|	तिट	कता|	गदी	गन||
×		०		१		०		२			३	

प्रकार /किस्मे

धा	धा|	दिंदिं	ता|	तिटतिट	धाता|	दिंदिं	ता|	तिट	कता|	तिटकता	गदीगन||
धा	धा|	दिंदिंदिं	ता|	तिटतिट	धाता|	दिंदिंदिं	ता|	तिट	कता|	गदी	गन||
धा	धाधाधा|	दिंदिंदिं	तातात|	तिट	धाधाधा|	दिंदिंदिं	तातात|	तिट	कता|	गदी	गन||
धा	Sधा|	Sदिं	Sता|	तिट	Sधा|	दिं	ता|	तिट	कता|	गदी	गन||
धा	धाधा|	दिं	ता|	तिट	धाधा|	दिं	ता|	तिट	कता|	गदी	गन||

उठान

धादिंता दिंदिंता| तकाथुंगा तकाथुंगा| तकधुमकिटतक तकगदिगन| धा तकधुमकिटतक| तकगदिगन धा| तकधुमकिटतक तकगदिगन||

स्तुती परण

बंदिश: श्रवण सुंदर| नाSम गणपती| ज्ञाSन नाSथग| जाSन नमूषक| धाSन धिकीट| तदंत धाकत्|
बोल: गदिन गेदीर| निदिगे नाSकीट| गेSन नाSगेS| गेSन नान्| धाSन धिकीट| तदंत धाकत्|
बंदिश: लंबोS दरएक| दंत धाकत्| लंबोS दरएक| दंत धाकत्| लंबोS दरएक| दंत धाकत्|
बोल: तेनेदि तिटकत| दिंत धाकत्| तेनेदि तिटकत| दिंत धाकत्| तेनेदि तिटकत| दिंत धाकत्||

परण

धागेतिट तागेतिट| धागेतिट तागेतिट| कड्धातिट धागेतिट| गदिगन नागेतिट| कतिटत गेनधागे| तिटकत गदिगन||

धागेतिट तागेतिट| कड्धातिट धागेतिट| गदिगन नागेतिट| कतिटत गेनधागे| तिटकत गदिगन| धाकत् धाकत्||

धागेतिट तागेतिट| धागेतिट तागेतिट| कड्धातिट धागेतिट| घींSतिरकिटतक तागेतिट| कतिटत गेनधागे| तिरकिटतकताS तिटकतगदिगन||

धागेतिट तागेतिट| धागेतिट तागेतिट| कड्धातिट धागेतिट| घेघेतिट किटतक| तिटकत गदिगन| धाSकत् गदिगन|

तिहाईयुक्त परण

धागेतिट तागेतिट| धागेतिट तागेतिट| कड्धातिट धागेतिट| गदिगन नागेतिट| कतिटत गेनधागे| तिटकत गदिगन|

धाSSS नागेतिट| कतिटत गेनधागे| तिटकत गदिगन| धाSSS नागेतिट| कतिटत गेनधागे| तिटकत गदिगन||

धागेतिट तागेतिट| धागेतिट तागेतिट| कड्धातिट धागेतिट| घींSतिरकिटतक तागेतिट| कतिटत गेनधागे| तिरकिटतकताS तिटकतगदिगन|
धाSSS तागेतिट| कतिटत गेनधागे| तिरकिटतकताS तिटकतगदिगन|| धाSSS तागेतिट| कतिटत गेनधागे| तिरकिटतकताS तिटकतगदिगन||

धागेतिटतागेतिट धागेतिटतागेतिट| कड्धातिटधागेतिट घेघेतिटकिटतक| तिटकतगदिगन धाSकत्गदिगन|
धाSSS तिटकतगदिगन| धाSकत्गदिगन धाSSS| तिटकतगदिगन धाSकत् गदिगन||

फरमाइश चक्रदार परण

दिंदिं दिंदिं | तिटतिट घेघेतिट| कड्धाकड् धाSकत| धा S कता| गदिगन धा | कतिटता SकSत |
धा कतिटता | SकSत धा | कतिटता SकSत | धा S | S दिंदिं| दिंदिं तिटतिट |
घेघेतिट कड्धाकड्| धाSकत धा| S कता गदिगन| धा कतिटता| SकSत धा| कतिटता SकSत|
धा कतिटता | SकSत धा | S S | दिंदिं दिंदिं | तिटतिट घेघेतिट| कड्धाकड् धाSकत|
धा S कता| गदिगन धा | कतिटता SकSत | धा S कता| गदिगन धा | कतिटता SकSत ||

कमाली चक्रदार

दिंदिं तिटतिट| धागेतिट तागेतिट| धागेतिट तागेतिट| कड्धातिट धागेतिट| गदिगन नागेतिट| तिटकत गदिगन|
धा धा| धा S| तिटकत गदिगन| धा धा| धा S| तिटकत गदिगन|
धा धा| धा S| दिंदिं तिटतिट| धागेतिट तागेतिट| धागेतिट तागेतिट| कड्धातिट धागेतिट|
गदिगन नागेतिट| तिटकत गदिगन| धा धा| धा S| तिटकत गदिगन| धा धा |
धा S| दिंदिं तिटतिट| धागेतिट तागेतिट| धागेतिट तागेतिट| कड्धातिट धागेतिट| गदिगन नागेतिट|
तिटकत गदिगन| धा धा| धा S| तिटकत गदिगन| धा धा| धा S||

तिहाई युक्त रचना

धाSकिट तकिटत | का धुमकिट| तकिटत का | दिं ता | धाSकिट तकधुम | तिटकत गदिगन |

धाS तिटकत| गदिगन धाS | तिटकत गदिगन | धाS धाधा | धाधाधा धाSकिट तकिटत का |

धुमकिट| तकिटत | का दिं| ता धाSकिट | तकधुम तिटकत | गदिगन धाS | तिटकत गदिगन |

धाS तिटकत | गदिगन धाS | धाधा धाधाधा | धाSकिट तकिटत | का धुमकिट | तकिटत का |

दिं ता | धाSकिट तकधुम | तिटकत गदिगन | धाS तिटकत | गदिगन | धाS | तिटकत गदिगन ||

गततुकडा: रचनाकार, मियाँ नासर खाँ ताज खाँ (पखावजी)

धाकिटतक् धुमकिटतक्| धाकिटतक् धुमकिटतक्| धिन्नडान तकिटधिकिट| घेघेतडन्न घेघेतडन्न| धाकिटतक् धुमकिटतक्| धाकिटतक् धुमकिटतक् |

धाकिटतक् धुमकिटतक्| धाS धाकिट्तक्| धुमकिटतक् धाकिटतक्| धुमकिटतक् धाS| धाकिटतक् धुमकिटतक्| धाकिटतक् धुमकिटतक्||

रेला

धाSकिट धुमकिट| तकिटत काSकिट| तकतक धुमकिट| तकिटत काSकिट| तकिटत काSधुम| तिटकत गदिगन|

दुप्पट

धाSकिटधुमकिट तकिटतकाSकिट| तकतकधुमकिट तकिटतकाSकिट| तकिटतकाSधुम तिटकतगदिगन|
धाSकिटधुमकिट तकिटतकाSकिट| तकतकधुमकिट तकिटतकाSकिट| तकिटतकाSधुम तिटकतगदिगन||

विस्तार

धाSकिटधुमकिट तकिटतकाSकिट| तकतकधुमकिट तकिटतकाSकिट| तकतकधुमकिट तकतकधुमकिट|
धाSकिटधुमकिट तकिटतकाSकिट| काSकिटधुमकिट तकतककाSकिट तकिटतकाSधुम तिटकतगदिगन||
धाSकिटधुमकिट तकिटतकाSकिट| तकतकधुमकिट तकतकधुमकिट| तकतकधुमकिट तकिटतकाSकिट|
ताSकिटधुमकिट तकिटतकाSकिट| तकतकधुमकिट तकतकधुमकिट| तकिटतकाSधुम तिटकतगदिगन||
धाSकिटधुमकिट तकिटतकाSकिट| धाSकिटधुमकिट तकिटतकाSकिट| धाSकिटधुमकिट तकिटतकाSकिट|

धाSकिटधुमकिट तकिटतकाSकिट| धाSकिटधुमकिट तकिटतकाSकिट| धाSकिटधुमकिट तकिटतकाSकिट||

धाSकिटधुमकिट तकिटतकाSकिट| तकतकधुमकिट तकिटतकाSकिट| धाSकिटधुमकिट तकिटतकाSकिट|

धाSकिटधुमकिट तकिटतकाSकिट| तकतकधुमकिट तकिटतकाSकिट| धाSकिटधुमकिट तकिटतकाSकिट||

धाSकिटधुमकिट तकिटतकाSकिट| तकतकधुमकिट तकिटतकाSकिट| तकतकधुमकिट तकतकधुमकिट|

धाSSS तकतकधुमकिट। तकतकधुमकिट धाSSS| तकतकधुमकिट तकतकधुमकिट||

तिहाई

तिटकत गदिगन| तादिं धाS| Sतिट कतगदि| गनधा दिंधा| SS तिटकत| गदिगन धादिं||

तिरकिटतकताS तिटकतगदिगन| तादिं धाS| Sतिरकिट तकताSतिटकत| गदिगनधाS तादिं| SS तिरकिटतकताS| तिटकतगदिगन धादिं||

धाSकिटधुमकिट तकिटतकाSकिट| धादिं धाS| SSधाSकिट धुमकिटतकिटत|
काSकिट धादिं धाS| SS धाSकिटधुमकिट| तकिटतकाSकिट धादिं||

धुमकिट धुमकिट| तकिटत काSकिट| धुमकिट धुमकिट| तकिटत काSकिट| धुमकिट तकधुम| तिटकत गदिगन||

धुमकिटधुमकिट तकिटतकाSकिट| धुमकिटधुमकिट तकिटतकाSकिट| धुमकिटतकधुम| तिटकतगदिगन|

धुमकिटधुमकिट तकिटतकाSकिट| धुमकिटधुमकिट तकिटतकाSकिट| धुमकिटतकधुम| तिटकतगदिगन||

विस्तार

धुमकिटधुमकिट तकिटतकाSकिट| धुमकिटधुमकिट तकिटतकाSकिट| तकतकतकधुम| तिटकतगदिगन|

धुमकिटधुमकिट तकिटतधाSकिट| धुमकिटधुमकिट तकिटतकाSकिट| तकतकतकधुम| तिटकतगदिगन||

धुमकिटधुमकिट तकिटतकाSकिट| धुमकिटधुमकिट तकिटतकाSकिट| तकतकतकधुम| तिटकतगदिगन|

धुमकिटधुमकिट तकिटतधाSकिट| धुमकिटधुमकिट तकिटतकाSकिट| तकतकतकधुम| तिटकतगदिगन||

धुमकिटधुमकिट तकिटतकाSकिट| तकतकतकधुम तकिटतकाSकिट| तकतकतकधुम तकिटतकाSकिट|

धुमकिटधुमकिट तकिटतकाSकिट| तकतकतकधुम तकिटतधाSकिट| तकतकतकधुम तकिटतकाSकिट||

तुकडे

धा धा| दिं ता| तिट धा| दिं ता| तिरकिट तकताS तिटकता गदीगन||

धा धा| दिं ता| तिट धा| दिं ता| तिटकता गदीगन धाकत् धाकत्||

समे पासून

तकिट धा| तकिट धा| घेतिट किटतक| तिटकता तकिट| धा तकिट| धा तकिट||

ताल: धमार

क धि ट धि ट| धा S| ग ति ट| ति ट ता S||
× २ ० ३

उठाण

धागेतिट किटतक तिटकिट धाधा दिंता| कडधा दिंता| कतकधी तिटकता गदीगन| धाकता गदीगन धाकता गदीगन||

धित्तधित्त धीटकीट धागेतिट धागेतिट गदीगन| नागेतिट कतीटता| गिनधा तिटकता गदीगन| धाSS नागेतिट कतीटता गीनधा|
तिटकता गदीगन धाSS तागेतिट कतिटता| गिनधा तिटकता| गदीगन धाSS नागेतिट| कतीटता गीनधा तिटकता गदीगन||

परण

धागेतिट धागेतिट तागेतिट तागेतिट कडधातिट| धागेतिट कताSन| धीत्ता धाSS कताSन| धीत्ता धाSS कताSन धीत्ता||

धागेतिट तागेतिट कडधातिट धागेतिट कडघेघे| तिटकता घेंतिरकीटतक| तागेतिट कतिटघीं तिटघेघे| तिटतिट कताकता कतीटधा दिंताघेघे|
तिटतिट कताSन धाकता Sनधा कताSन| घीता धाSS| ताSS कताSन घिता| धाSS ताSS कताSन घिता||

धीटधीट धातिट घेघेतीट गदीगन कडतिट| तिटकत धातिटक| धातिटक| धातिट धातिटक| धातिट कडतिट तिटकत गदीगन|
घेघेतीट गदीगन धाSS आSS कडतिट| तिटकत घेघेतीट| गदीगन| धाSS आSS| कडतिट तिटकत घेघेतीट गदीगन||

धागेतिट घिडाSन घीड़नक तिरकीट घिडाSन| धाघिडा Sनधा| घिडाSन धाSS आSS| धागेतिट घिडाSन घीड़नक तिरकीट|
घिडाSन घीड़नक तिरकीट घिडाSन धाघिडा| Sनधा घिडाSन| धाSS आSS धागेतिट| घिडाSन घीड़नक तिरकीट घिडाSन||

तिहाई

धागेतिट तागेतिट धागेतिट धागेतिट तागेतिट| कडधातिट धागेतिट| कडधेत्तान धा धा| कडधेत्तान धा धा कडधेत्तान धा धा||

धीटधीट कतधा नधान धाधा धीटधीट| धागेतिट कडधातिट| धागेतिट धा कडधातिट| धागेतिट धा कडधातिट धागेतिट||

चक्रदार

(तकतक तकतक धीत्ता किटतक तकधुम किटतक धिलांग दिगितक तकीटधी किटतक घीSन्त किटतक तकधुम किटतक धाघीं किटतक ताधा तकतक दींता किटतक तकधुम किटतक गदिगन धाधा धा किटतक तकधुम किटतक गदिगन धाधा धा किटतक तकधुम किटतक गदीगन धाधा धाSSS SSSSत) ×**3**

ताल: सुलताल

धा	धा|	दिं	ता|	तिट	धा|	तिट	कता|	गदी	गन‖
×		०		२		३		०		

उठाण

धागेतिट	तागेतिट|	कताऽन	घिता |	तिटकत	गदीगन |	धाऽऽ	गदीगन |	धाऽऽ	गदीगन‖
धागेतिट	तागेतिट	कडधातिट	धागेतिट|	घेघेतीट	किटतक|	तिटकत	गदीगन|	धाता	गदीगन‖

परण

धागेतिट	धागेतिट|	गदीगन	धात्ती|	धाऽऽ	गदीगन|	धात्ती	धाऽऽ|	गदीगन	धात्ती ‖
धागेतिट	कताऽन|	धाऽऽ	कताऽन|	धाऽऽ	कताऽन|	धाऽऽ	धागेतिट|	कताऽन	धाऽऽ|
कताऽन	धाऽऽ|	कताऽन	धाऽऽ|	धागेतिट	कताऽन|	धाऽऽ	कताऽन|	धाऽऽ	कताऽन ‖

कमाली चक्रदार

धागेतिट	तागेतिट	कडधातिट	धागेतिट	गदिंगन	नागेतिट	कतिटत्	गनधागे	तिटकता	गदिगन
धा	धा	धा	तिटकता	गदिनगन	धा	धा	धा	तिटकता	गदिनगन
धा	धा	धा	S	धागेतिट	तागेतिट	कडधातिट	धागेतिट	गदिंगन	नागेतिट
कतिटत्	गनधागे	तिटकता	गदिगन	धा	धा	धा	तिटकता	गदिनगन	धा
धा	धा	तिटकता	गदिगन	धा	धा	धा	S	धागेतिट	तागेतिट
कडधातिट	धागेतिट	गदिंगन	नागेतिट	कतिटत्	गनधागे	तिटकता	गदिगन	धा	धा
धा	तिटकता	गदिगन	धा	धा	धा	तिटकता	गदिगन	धा	धा

चक्रदार

(धागेतिट तागेतिट |धागेतिट तागेतिट| कडधातिट धागेतिट| कडधातिट धागेतिट| गदीगन नागेतिट| गदीगन नागेतिट|

गदीगन धाधा| धा गदीगन| धाधा धा| गदीगन धाधा| धा कडांन| गदीगन धाधा| धा गदीगन| धाधा धा| गदीगन धाधा|

धा कडांSन| गदीगन धाधा| धा गदीगन| धाधा धा| गदीगन धाधा|) ×3

दिंदिं तिटतिट धागेतिट तागेतिट धातिटधा तिटधागे दिंदिं ता तिटकत धाता धा तिटकत धाता धा तिटकत धाता धा ×3

प्रकरण ६. पखवाजाची घराणे

प्रस्तावना: घराण्यांच्या उगमा पूर्वी विविध **मत** अस्तित्वात होते जसे **भरत मत, शिव मत, हनुमत, नारद मत.** नंतरच्या कालावधीत वेगवेगळ्या **बाणी** अस्तित्वात आल्या जसे **गौड बाणी, नौहार बाणी, खंडहार बाणी आणि डागुर बाणी.** नंतरच्या कालावधीत घराणे उदयास आले यात **कुदुऊ सिंह घराणे, नाथद्वारा घराणे, नाना पानसे घराणे, मंगळ वेढेकर घराणे इ**. घाराण्यांचा समावेश होतो म्हणजेच **घराण्यांचा आधार हा विविध मते आणि बाणी हे आहेत.**

कदुऊ सिंह घराणे: कदुऊ सिंह घराण्याचे प्रवर्तक हे कदुऊ सिंह हेच आहेत. पं. कदुऊ सिंह यांच्या नावावरूनच या घराण्याची निर्मिती झाली. या घराण्याची सुरुवात १८ व्या शतकाच्या पूर्वार्धात झालेली दिसून येते, याच कालावधीमध्ये ब्रिटिशांचे शासन हळूहळू आपले पाय घट्ट करू लागले होते आणि या प्रतिकूल परिस्थितीमध्ये कदुऊ सिंह यांनी कला जिवंत ठेवण्याचे कार्य केले. याच कालावधीमध्ये शास्त्रीय संगीतास वेगवेगळ्या राजे, महाराजांनी राजाश्रय दिल्यामुळे ही कला तत्कालीन परिस्थितीमध्ये जिवंत राहिली.

पं. कदुऊ सिंह पूर्ण नाव पं. कदुऊ सिंह तिवारी असल्याचे लक्षात येते. पं. कदुऊ सिंह हे राजा विश्वनाथ सिंह यांच्या दरबारी दरबारामध्ये दरबारी कलावंत म्हणून कार्यरत होते. यांनी हजारो वेगवेगळ्या रचना

निर्माण केल्या. यामध्ये गज परण, शिवतांडव परण, समुद्र लाटां वरील परण, अश्व परण, दुर्गा परण, गणेश परण यासारख्या वेगवेगळ्या पखवाज वरील रचना निर्माण केल्या. पं. कदुऊ सिंह यांचा मृत्यू १९६० साली वयाच्या ९५ वर्षीय झाला.

कदुऊ सिंह घराण्याची विशेषता म्हणजे या घराण्याचा बाज हा अतिशय गंभीर पूर्ण आहे. या घराण्यातील बोल रचना या अतिशय मोठमोठ्या आणि स्पष्ट बोल निर्माण करणाऱ्या आहेत. या घराण्याचे वैशिष्टे म्हणजे एका आवर्तना पासून ते २४ – २४ आवर्तना पर्यंत रचनांचा समावेश होतो. कदुऊ सिंह बाज हा नाना पानसे घराण्या पेक्षा वजनदार आणि गंभीर पूर्ण आहे. यांच्या रचनांमध्ये **धरांग, तडांग, धेत्ता, तक्का, थुंगा** यासारख्या जोरकस बोलांचा समावेश होतो. या गंभीर पूर्ण आणि वजनदार बाजाराचे कारण म्हणजे कदुऊ सिंह हे एक देवी भक्त होते आणि याचाच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम वीर रस किंवा बाज जोरकस किंवा वजनदार आहे.

त्यांनी आयुष्यभर विद्यादानाचे कार्य अतिशय समर्थपणे केले. त्यांच्या शिष्य परिवारामध्ये पं. मदन मोहन उपाध्याय. पं. राजकुमार दास, दरभंगा येथील भैय्यालाल, त्यांचे भाऊ रामसिंह, बंगालातील पं. दीपचन्द्र भट्टाचार्य इ. यासारख्या वेगवेगळ्या महान पखवाज वादांकाचा समावेश होतो.

नाना पानसे घराणे: नाना पानसे घराण्याचा बाज साधा आणि मऊ आहे. खूप लांब, अतिशय कठीण शब्दांचा किंवा बोलांचा वापर त्यांच्यासाठी बाधक नव्हता. कदुऊ सिंह घराण्याच्या क्लिष्ट शब्दांच्या जागी धुमकीट, किटतक, धडंग, तगन, गडिगन, धिरधिरकिटतक, तिरकीट इत्यादी साध्या बोलांचा वापर या घराण्यात दिसून येतो. शब्दांच्या निर्मितीमध्ये प्रत्येक शब्दाचा समावेशही तिथे दिसत असला, तरी चालणाऱ्या किंवा धावत्या बोलांना त्यांच्या शैलीत विशेष महत्त्व दिले जाते. त्याची रेलचेल साधी असूनही, गोडपणाच्या दृष्टिकोनातून अतिशय सुंदर आहे आणि कोणत्याही त्रासाशिवाय वेगवान लयीत वादन होते. कदुऊ सिंह घराण्याचा बाज गंभीर, जोरदार आणि उत्कट होता, तर पानसेजींचा स्वभाव मृदू, मधुर आणि साधा होता. **'ताल का बांध'** हे पानसे घराण्याचे वैशिष्ट्य मानले जाते. प्रथम हाताने एक ताल देऊन बोल लयबद्ध केली जातात. शिष्य तालात बसल्याशिवाय वाद्याला स्पर्श करू शकत नाही. त्यांच्या समवयस्कांमध्ये गणिताचे स्थान अग्रस्थानी आहे. त्याच्या आवाजात हिशोबाच्या बाबी इतक्या सुंदर पद्धतीने सजवल्या आहेत की त्यांच्या अभ्यासू बुद्धीने लोक मंत्रमुग्ध झाल्याशिवाय राहणार नाहीत.

नाना पानसे यांना राजाश्रय प्राप्त नंतर त्यांनी आपल्या प्रतिभेच्या आणि गुरुमुखी प्राप्त झालेल्या विद्येच्या आधारावर यामध्ये अनेक बदल केले. यामुळे एक नवी दृष्टी समोर आली. त्यांच्या अभ्यासाला गणितिय

किंवा शास्त्रशुद्ध दृष्टिकोन प्राप्त होता. या आधारे त्यांनी नवनवीन परनांनचा किंवा रचनांचा, नवीन तालांचा अविष्कार केला. नाना पानसे घराणे अतिशय कोमल बोलांचे किंवा कोमल बाजाचे, सरळ साधे घराणे म्हणून ओळखले जाते. नाना पानसे हे पखवाज वादना बरोबरच तबला वादनात देखील प्रवीण होते.

पानसे घराण्याच्या विशेषता :

१) सरळ, साधा व मुलायम बाज.

२) छोटी परण.

३) धुमकिट, गदिगन, तकतक, धिरधिरकिटतक हे विशेष बोल.

४) धावत्या बोलांचा आधार घेऊन रचलेले रेले असतात पण कर्णमधुर असतात.

५) या घराण्याची विशेषता म्हणजे “लयबंध." कुठल्याही बोलाला आधी लयीत अथवा तालात बसवून मगच त्याचे वादन होते.

६) गणित शास्त्रावर आधारित परण आहेत.

७) अजून एक विशेषता म्हणजे बंदिशीमध्ये ३-३ मात्रांचा हिशोब व ३-३ बोलांचे खंड असतात.

नाना पानसे हे एक उत्कृष्ट पखवाज वादक तर होतेच परंतु त्याबरोबरच ते उत्कृष्ट शिक्षक म्हणून देखील ओळखले जात असत. त्यांनी

महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि दक्षिण भारत या भागांमध्ये किंवा राज्यांमध्ये पखवाजाचा प्रचार-प्रसार केला. अध्ययन अध्यापनाच्या प्रवासामध्ये त्यांच्याकडून खूप मोठी शिष्य निर्माण केले गेले. यामध्ये प्रमुख्याने त्यांचे सुपुत्र बळवंत पानसे, त्यांचे नातू शंकर भैया पानसे सखाराम बुवा आगले, वामनराव वाडकर, बळवंतराव वैद्य, शंकरराव वाकुडकर, गुरुदेव पटवर्धन, बाबुराव गोखले, देवकीनंदन महाराज यासारख्या शिष्यांचा समावेश होतो.

थोडक्यात, नाना पानसे घराण्याचा बाज हा कोमल आहे, तो धावता आहे. या घराण्यातील परने अतिशय कठीण आणि मोठी आहेत. तालाच्या वेगवेगळ्या रचनांमध्ये धुमकिट, धरांग, धीरधीरकिटतक यांचा समावेश होतो. रचनांमध्ये धावत्या बोलांचा समावेश असल्यामुळे हा बाज वेगवान किंवा गतिशील म्हणून देखील ओळखला जातो. या घराचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे शास्त्रशुद्ध पद्धतीने बांधलेल्या वेग वेगळ्या रचना हे आहे. वादनापुर्वी बोल हातावर बसविली जातात व नंतर वादन होते. जेणे करून वादन लययुक्त होते.

नाथद्वारा घराणे: नाथद्वारा घराणे हे पखवाजाच्या जुन्या घराण्यांपैकी एक महत्त्वाचे घराणे आहे. अठराव्या शतकाच्या सुरुवातीस संगीताला राजाश्रय होता. संत कलाकारांना मोठ्या मंदिरांमध्ये संरक्षण मिळाले. याच संत आणि त्यांच्या शिष्यांच्याद्वारे या घराण्याची उत्पत्ती झालेली दिसून येते. हे घराणे जवळपास तीनशे वर्ष जुने आहे. या घराण्याचे जनक म्हणून **पंडित तुलसीदास** यांना मानले जाते. जयपुर जवळील **अमेर** या गावी या घराण्याचा प्रारंभ झालेला दिसून येतो. पंडित तुळशीराम यांच्या पाचव्या पिढीतील पंडित वल्लभदास यांनी पंडित रुपरामजी यांच्याकडून पखवाजाचे प्रारंभिक शिक्षण घेतले आणि त्यानंतर दरबारी कलाकार पंडित पहाड सिंग यांच्याकडून पखवाजाचे शिक्षण घेतले.

संगीताच्या इतिहासानुसार असे लक्षात येते की नाथद्वारा याठिकाणी बाहेरून आलेल्या कलावंतांसोबत पखवाज वादन आणि पखवाजाचे अध्ययन-अध्यापन या संदर्भामध्ये त्या काळात चर्चासत्रांचे आयोजन देखील होत होते. याच घराण्याचे पंडित खेमलाल हे ज्या वेळेस **मृदंग सागर** या पुस्तकाचे लिखाण काम करत होते, त्याच वेळी **शंकरलाल** यांनी आपल्या पखवाजवादन कलेचा प्रसार करत होते. ते वेगळ्या राजा-महाराजांच्या दरबारामध्ये जाऊन पखवाज वादन करत होते. पखवाजाच्या प्रचार, प्रसारार्थ बाहेर पडलेल्या शंकरलाल यांनी

ज्यावेळेस परतीचा मार्ग पकडला त्यावेळेस प्रवासात त्यांचा मृत्यू झाला.

पंडित रूपरामजींच्या शिष्य परंपरेतील म्हणजेच नाथद्वारा परंपरेतील काही महत्त्वाच्या शिष्यांच्या नावांमध्ये त्यांचे पुत्र पंडित शंकरलाल व पंडित खेमलाल तसेच त्यांचे शिष्य आदित्यराम यांचा समावेश होतो.

नाथद्वारा घराण्याचे वैशिष्ट्य म्हणजे या घराण्याची वादन शैली हि कुदुऊ सिंह आणि नाना पानसे घराण्यांशी या घराण्यांशी मिळती जुळती असताना दिसून येते.

या घराण्याच्या वादन श्रेणीमध्ये तिट च्या ऐवजी किट हा शब्द वापरला जातो. उदा. धाSकिटतक, ताSकिटतक, तिरकिटतक, किटतक इ. तसेच या घराण्यात **धाघिननक, धेत्घिननक** या सारख्या बोलांचा समावेश होतो. हे या घराण्याचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे.

गुरव परंपरा आणि मंगळवेढेकर घराणे:

महाराष्ट्रातील संगीत परंपरेवर संत वांग्मयाचा परिणाम दिसून येतो. महाराष्ट्र राज्यामध्ये संगीताचे भक्तिमय रूप दिसून येते. अर्थात त्यावर हिंदू संस्कृतीचा परिणाम झालेला दिसून येतो. भक्तिमय स्वरूप असल्यामुळे यावर व्यावसायिकतेचा कमी परिणाम झालेला दिसून येतो. महाराष्ट्रीयन लोकांनी संगीताला विद्या आणि संस्कृतीचे एक महत्त्वाचे माध्यम मानले होते. महाराष्ट्रातील गुरव समाजाने ध्रुपद-धमार यासारख्या शास्त्रीय संगीताला संजीवनी देण्याचे कार्य केले. या समाजाने मंदिरातील सेवा आणि देवाची पूजा याबरोबरच भजन, कीर्तन च्या माध्यमातून ते भक्तिमय वातावरणात निर्माण केले. याच माध्यमातून पखवाजाचा प्रचार-प्रसार मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो. गुरुपरंपरा हि सर्वसाधारणपणे तीनशे वर्षांपूर्वीची असताना दिसून येते. परंतु या घराण्याचा किंवा परंपरेचा अखंडपणे विकास झालेला दिसून येत नाही. सुरुवातीच्या पिढीतील परंपरा निर्माण करणारे संगीत उपासक होते त्यांच्याबद्दल विशेष माहिती उपलब्ध नाही. नानासाहेब यांच्या दरबारामध्ये मृदंग वादक पं. धर्मा गुरव यांचा उल्लेख आढळून येतो. त्याबरोबरच बाजीराव पेशवे त्यांच्या दरबारात देखील पं. नागू गुरव तसेच पं. देविदास भैरोजी यांचाही उल्लेख आढळून येतो, हे पेशवा दरबारामध्ये मृदंग वादनाचे कार्य करत होते. इतिहासानुसार मंगळवेढेकर घराण्याचे आदिपुरुष पं. विठ्ठलाचार्य जोशी हे आहेत.

विठ्ठलाचार्य जोशी हे मंगळवेढा या गावचे असताना दिसून येतात. ते मंदिरामध्ये पुजारी होत. याच घराण्याच्या शिष्यांपैकी पंडित नारायणराव यांनी आपले मित्र नारायण बुवा थेटे यांच्या सहकार्याने १९१४ साली पंढरपूर येथे **'धर्मार्थ महाराष्ट्र संगीत विद्यालय'** उघडले. या संस्थेच्या अंतर्गत शेकडो विद्यार्थ्यांना नि:शुल्क विद्यादान होताना दिसून येते. या ठिकाणी गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणा बरोबरच त्यांची राहण्याची उदरनिर्वाहाची आणि वस्त्राची सुविधादेखील पुरविण्यात येते. या घराण्याचे पं. दासोपंत हे उत्कृष्ठ तबला, पखवाज वादक, नर्तक आणि जलतरंग वादक होते. त्यांनी महाराष्ट्रातील आकाशवाणीवर देखील उत्कृष्ट पद्धतीने पखवाजवादन केले. **ते महाराष्ट्राच्या आकाशवाणीतील सर्वात पहिले मृदंग वादक होते.**

मंगळवेढेकर घराण्याच्या संदर्भात प्रामुख्याने पं. परशुराम गुरव, पं. जनार्दनपंत जोशी या यांचा प्रामुख्याने उल्लेख होतो पं. धर्माजी गुरव आणि त्यांचे पुत्र रघुनाथ बुवा गुरव हे प्रसिद्ध कलावंत होते.

मंगळवेढेकर घराण्याची शैली किंवा वैशिष्ट्ये: मंगळवेढेकर घराण्याचा बाज हा इतर घराण्यांच्या बाजा पेक्षा वेगळा होता. त्यामध्ये भारदस्तपणा याबरोबरच लय आणि बाट या कलेचा देखील समावेश होताना दिसून येतो. याबरोबरच बंदीची भाषा, लयकारी आणि पखवाज

वादन मध्ये पूर्ण हाताच्या पुर्ण पंजाचा वापर होताना दिसून येतो. तसेच द्रुत लयी साठी हाताचा वेगळा अभ्यास असताना दिसून येतो. जोरदार वादन, लयींचे गुंफण, पूर्ण पंजाचा वापर, लयीत वादन करण्यासाठी केली जाणारी हातांची तयारी अन्य घराण्यांपेक्षा वेगळी. विविध लयकारींमध्ये वादन हि वैशिष्टे असताना दिसून येतात.

प्रकरण ७. पखवाज वादकांचा जीवन परिचय

पं. नानासाहेब पानसे

पं. स्वामी पागल दास

पं. राजा छत्रपती सिंह

पं. कदुऊ सिंह

पं. पुरुषोत्तम दास पखवाजी

पं. गोविंदराव बऱ्हाणपूरकर

पं. बाबुराव डवरी

पं. शंकर बापू आपेगावकर

नानासाहेब पानसे: (१८४०-१९१७)

मूळ नाव नारायण पानसे हे होते. जन्म वाईजवळील बावधन या गावी झाला होता. लहानपणापासूनच त्यांच्यावर संगीताचे संस्कार होते. बाल्यावस्थेत त्यांनी आपले पखवाज वादनाचे शिक्षण आपल्या वडिलांकडे सुरू केले. त्यानंतर त्यांनी पुणे दरबारचे पखवाजी श्री. कोतडीकर यांचेकडून काही दिवस शिक्षण घेतले. **वाईचे पानसे ह्या कीर्तनकारांच्या साथीला मृदंग वाजवत म्हणून त्यांना 'पानशांचा नाना' म्हणू लागले.** त्यांचे सुरुवातीचे थोडे शिक्षण त्या काळातील प्रसिद्ध पखावजवादक वाईचे चौंडे महाराज यांच्याकडे झाले. पुढे जोरवरसिंगाच्या परंपरेतील ज्योतिसिंग (जोधसिंग) नावाच्या राजपूत ब्राह्मणाकडे सु. बारा वर्षे काशीस त्यांचा मृदंगवादनाचा अभ्यास झाला. त्यानंतर ते इंदोर येथे आले. तिथे त्यांना राजाश्रय मिळाला.

कुदऊ सिंग यांनी स्वत:च्या कला अभ्यास, वादन पराकडम, प्रभावशाली व्यक्तिमत्त्व आणि विस्तीर्ण परंपरा याच्या जोरावर पखावाज क्षेत्रात एवढा दबदबा निर्माण केला होता की दुसऱ्या शंभर वर्षांपर्यंत पखावाज क्षेत्रात इतर कोणत्याही घराण्याची उत्पत्ती झाल्याची कल्पनाही येत नाही अशक्य वाटत होते, पण त्यांच्या हयातीतच कलेच्या क्षितिजावर एक अलौकिक प्रतिभेचा उदय झाला

होता, ज्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाने पुढे कलाविश्व उजळून टाकले आणि नवा प्रकाश दिला. त्या कलावंताचे नाव होते **'नाना पानसे'.**

आपली संगीत साधना, प्रतिभा व संगीताचे प्रचंड ज्ञान यांचा वापर करून त्यांनी पखवाज वादनात काही मौलिक बदल घडवून आणले. ग्रंथांचे वाचन करून गणिताचा आधार घेऊन अनेक परणांचे त्यांनी नवीनीकरण केले. नवीन ठेक्यांचा विकास केला. पखवाजाचे शिक्षण सरळ व सोपे व्हावे म्हणून मात्राबद्ध पद्धतीचा विकास करून मात्रा मोजण्याच्या पद्धतीला शास्त्राधार दिला. पराकाष्ठेच्या मेहनतीमुळे त्यांच्या वादनात अतिशय नरमाई आली. त्यांच्या घराण्याचे म्हणून जे काही बोल उपलब्ध आहेत, त्यांत लयकारीच्या अंगाने नजाकतदार वादन केले जाते. तबलावादन आणि नृत्यकला ह्यांतही त्यांनी प्रावीण्य संपादन केले. शिकविण्याचा सरल सुलभ पद्धतीमुळे त्यांना मोठा शिष्यवर्ग लाभला. बळवंतराव पानसे, वामनराव पानसे आणि सखारामपंत आंगले ह्यांना त्यांनी पखावज आणि वामनराव चांदवडकर यांना तबला शिकविला. 'सुदर्शन' ह्या नावाचा नवीन ठेका त्यांनी बांधला. इंदूर सरकारचा त्यांना राजाश्रय होता.

तत्कालीन अभ्यासकांच्या मतानुसार, उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत नाना पानसे यांच्यासारखा सुरेल वादक आणि ताल गणितज्ञ दुसरा कोणीच नव्हता. नाना पानसे यांना ताल शास्त्राचा नायक

म्हटले जायचे. कुदऊ सिंग यांच्यामुळे पखावाजची ख्याती उत्तर भारतात विपुल प्रमाणात होती, परंतु महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि दक्षिण भारतातील काही प्रदेशांमध्ये पखावाजच्या प्रचार आणि प्रसाराचे मुख्य श्रेय नाना पानसे यांना जाते. कुदऊ सिंग महाराजांचे समकालीन **बाबू जोधसिंग** हे उत्कृष्ट आणि संत मृदगाचार्य झाले आहेत. नाना पानसे यांचे ते गुरू होते. नानांसारखा प्रतिभावान शिष्य घडवून त्यांनी संगीतविश्वाला दिलेले योगदान खरोखरच अतुलनीय होते. बाबू जोध सिंगच्या गुरूबद्दल दोन मतप्रवाह आहेत. एका मतानुसार ते लाला भवानी दिन यांचे शिष्य आणि कुडसिंगचे गुरु भाई होते. दुस-या मतानुसार ते लाला फक्त किशनच्या परंपरेशी संबंधित आहेत. छेडारामच्या पोईमध्ये बाबू जोध सिंग यांचे वर्णन भवानी दास यांचे नातू आणि टोका राम यांचा मुलगा असे केले आहे. बाबू जोध सिंग हे एक उत्कृष्ट पखावजी होते आणि ते लाला भवानी दिन किंवा भवानी दास यांच्या परंपरेतील होते. दोन्ही धर्माच्या लोकांनी त्याला भवानी दिन किंवा भवानी दासशी जोडले आहे. असे म्हटले जाते की बाबू जोधसिंग आपल्या एकांतवासात कामगिरी आणि प्रसिद्धीपासून दूर राहायचे आणि भक्तीभावाने वीणा पाणीदेवी सरस्वतीच्या चरणी आपले मृदंग वादन करत. इ.स. १८४८ मध्ये बाबूजींची लखनऊच्या वाजिद अली शाहच्या दरबारात कुदऊ सिंग यांच्याशी स्पर्धा झाल्याचा उल्लेख आहे. श्री पागल दास (अयोध्या) आणि डॉ. रामवल्लभ

(बरेली) आणि कुदऊ सिंह घराण्याच्या काही विद्वानांनी बाबू जोधसिंग यांचे वर्णन लाला भवानीदिन यांचे शिष्य आणि कुदऊ सिंह यांचे गुरु असे केले आहे. पानसे पारणे येथील कै. सखाराम पखावजी (लखनौ) हे देखील बाबूजींना लाला भवानी दून यांचे शिष्य म्हणायचे.

नाना पानसे यांनी त्यांचा मुलगा बळवंतराव पानसे यांना उत्कृष्ट कलाकार म्हणून तयार केले, परंतु दुर्दैवाने त्यांचे लहान वयात निधन झाले. आपल्या मुलाच्या आकस्मिक मृत्यूमुळे ते खूप दुःखी आणि अस्वस्थ झाले आणि उन्नीरवीच्या लग्नानंतर ते जग सोडून गेले. नाना पानसेंच्या अनेक शिष्यांनी पखावाजावर पुस्तके लिहिली लखनौचे प्राध्यापक कै. पं. सखा राम मृदंगाचार्य यांचे मृदंग तबला शिक्षण आणि सुप्रसिद्ध मृदंगकेसरी पं. गोविंद राव बुऱ्हाणपूरकर यांचे 'मृदंग तबला वादन सुबोध' (तीन भाग) आणि 'भारतीय तपस्वी' हे प्रसिध्द आहेत. नाना पानसेजी हे अतिशय कोमल मनाचे व्यक्ती होते. छोट्या-मोठ्या सर्व कलाकारांचा ते मनापासून आदर करायचे.

नाना पानसे-पुत्र-बलवंतराव, नातू-शंकरराव पानसे. नाना पानसे-शिष्य-सखाराम ओगले, वामनराव, बलवंत वैद्य, अलकूटकर, गोविंदराज वैद्य.

नाना पानसे यांचा मृत्यू १९१७ इंदूर येथे झाला.

पं. स्वामी पागल दास

स्वामी पागल दास यांचा जन्म **१५ ऑगस्ट १९२०** रोजी उत्तर प्रदेश मधील देवरिया या गावी झाला. स्वामी पागल दास यांच्या जन्माचा कालावधी पाहता असे लक्षात येते की स्वामी पागल दास यांचा जन्म स्वातंत्र्यपूर्व काळात झालेला दिसून येतो या काळामध्ये ब्रिटीशांची सत्ता असताना स्वामी पागल दास यांनी संगीताच्या प्रचार प्रसाराचे कार्य समर्थपणे केलेले दिसून येते. स्वामी पागल दास हे सुरवातीच्या कालावधीत अभिनयाशी जोडले गेले होते. याबरोबरच पखवाज आणि गाण्याची प्रारंभिक शिक्षण देखील त्यांनी घेतलेली दिसून येते. स्वामी पागल दास यांच्या गुरु मध्ये स्वामी रामकृष्ण दास, स्वामी भगवानदास बाबा, ठाकुर दास, श्री राम मोहिनी शरण तसेच पंडित संत शरण मस्त आदींचा उल्लेख होतो. सुरवातीचे पाच वर्ष त्यांनी स्वामी भगवान दास याच्या कडून तबल्याचे शिक्षण घेतले. त्या नंतर २० वर्ष बाबा ठाकूर दास आणि राम मोहिनी शरण यांच्या कडून पखवाजाचे शिक्षण घेतले. **संत शरण मस्त यांनी त्याचे नाव पागल दास ठेवले.**

स्वामी पागल दास कुदुऊ सिंह घराणे आणि अवधी घराण्याची संबंधित पखवाज वादक असताना दिसून येतात सुरुवातीच्या काळात त्यांनी तबला वादन केले परंतु १९६२ नंतर त्यांनी त्याचा त्याग करून केवळ पखवाजाच्या प्रसिद्धीसाठी कार्य करण्याचे

ठरवले. स्वामी पागल दास यांनी **हनुमंत विश्व कला संगीत आश्रमाची** स्थापना केली. या आश्रमाच्या माध्यमातून अनेक पखवाज वाजविणारे शिष्य निर्माण झाली. यामध्ये प्रामुख्याने श्री राज खुशीराम, श्री राम किशोर दास, श्री संतोष दास, संजय पागरे, के.के. उपाध्याय यांचा समावेश होतो.

स्वामी स्वामी पागल दास यांनी ग्रंथ संपदा देखील निर्माण केलेली दिसून येते. यामध्ये दोन भागात मृदंग तबला प्रभाकर आणि तबला कौमुदी तीन भागात ही पुस्तके लिहिली, याबरोबरच त्यांनी वेगळ्या वृत्तपत्रातून आणि साप्ताहिकातून संशोधन लेख लिहिले. त्यांना वेगवेगळ्या प्रकारची पुरस्कार प्राप्त झालेले दिसून येतात. यामध्ये मृदंगमार्तंड, मृदंगकेसरी, संगीत सम्राट, नाना पानसे पुरस्काराने गौरविण्यात आले. अवध विश्वविद्यालयाने त्यांना डी. लिट. हि मानद पद्वी प्रदान केली. अशा या श्रेष्ठ कलावंताचे निधन २० जानेवारी १९९७ झाले.

पं. राजा छत्रपती सिंह

राजा छत्रपती सिंह यांच्या जन्माचा कालावधी देखील स्वातंत्र्यपूर्वकाळात असताना दिसून येतो. राजा छत्रपती सिंह यांचा जन्म १९१९ साली उत्तर प्रदेशातील, झाशी येथील बिजना या गावी झाला ते राजा हिंमत सिंह यांचे पुत्र होते.

अयोध्या येथे स्वामी रामदास यांचे पखवाज वादन ऐकून ते प्रभावित झाले आणि त्याच वेळेस त्यांनी निर्धार केला की आपले संपूर्ण जीवन हे पखवाजाच्या प्रसार आणि प्रसारासाठी समर्पित करावे. स्वामी रामदास हे कुदुऊ सिंह यांचे शिष्य मदन मोहन यांचे शिष्य होते.

छत्रपती सिंह यांनी आपले संपूर्ण आयुष्य पखवाजास समर्पित केले होते. या त्यांच्या सांगीतिक कार्याबद्दल त्यांना वेगवेगळे पुरस्कार प्राप्त झाले यामध्ये १९५१ साली संगीत मार्तंड, १९५४ साली ऑल इंडिया म्युझिक कॉन्फरन्स ट्रस्ट च्या परीक्षा मध्ये प्रथम क्रमांक मिळाला. छत्रपती सिंह हे उच्चकोटीचे पखवाज वादक तर होतेच परंतु ते एक संगीतकारही होते. १९७५ साली ते विदेशी प्रवास साठी गेले होते. त्यांनी त्यावेळी वेगवेगळ्या देशांमध्ये आपल्या पखवाज वादनाने रसिकांवर छाप टाकली होती. धृपद आणि धमार यास रस निर्मित साथ-

संगत तसेच प्रभावी स्वतंत्र पखवाज वादन यामुळे पखवाजाच्या प्रचार-प्रसारात त्यांचे महत्वपूर्ण योगदान राहिले.

त्यांच्या शिष्य परिवारामध्ये प्रमुख्याने चित्रांगणा सिंग (सितार वादक), प्रवीण आर्य, अखिलेश गुंदेचा, अनिल कुमार यासारख्या वेगवेगळ्या पखवाज वादकांचा समावेश होतो. अशा या तपस्वी पखवाजवादकाचा मृत्यू ११ सप्टेंबर १९९८ साली झाला.

पं. कदुऊ सिंह

यांचा जन्म १८१५ साली उत्तर प्रदेश मध्ये झालेला दिसून येतो. यांच्या वडीलाचे नाव गप्पे होते. पं. कदुऊ सिंह यांचे पखवाजाचे शिक्षण भवानी सिंह यांच्याकडे झाले. ग्वालियरच्या महाराजांनी त्यांना **'पखवाज केसरी'** ची उपाधी दिली तर **'कुवर दास'** ही पदवी कला पारखी नवाब यांनी दिली. ते देवीचे भक्त होते. त्यांच्या पखवाजवादन यामुळे उन्मत्त झालेला हत्ती देखील नियंत्रणात येत असे म्हणून त्यांच्या परनाला गज परण म्हणून देखील ओळखले जाते.

प्रतिकूल काळातही त्यांनी अनेक शिष्य घडविले म्हणून **'सिंह घराणे'** म्हणून त्यांचे घराणे प्रसिद्धीस आले. ते गंगाधरराव यांच्या नाटक मंडळात काम करत होते. त्यांचा इंग्रजां सोबत सुसंवाद नव्हता म्हणून, स्नेहीं सहित त्यांच्या संबंधित शिष्यांना, मित्रांना बंदी केले होते. तेथील राणीला ही बातमी लागतात त्यांना मुक्त केले. परंतु एक आठवण म्हणुन यांनी बेड्या आपल्या पायातच ठेवल्या. त्यांच्या शिष्य परिवारामध्ये प्रमुख्याने पर्वत सिंह, देवकीनंदन पाठक, विष्णुदेव पाठक, त्यांचा मुलगा भैया लाल यांचा प्रामुख्याने उल्लेख होतो वयाच्या ९५ व्या वर्षी १९१० साली त्यांचे निधन झाले.

पं. पुरुषोत्तम दास पखवाजी

पुरूषोत्तम दास यांचा जन्म १९०७ साली नाथद्वारा येथे झाला. त्यांचे वडील घनश्याम हे एक सुप्रसिद्ध पखवाज वादक होते. त्यांनी **मृदंग सागर** हे पुस्तक लिहिले. पुरुषोत्तमदास केवळ बारा वर्षाचे असताना त्यांचे वडील वारले. त्यानंतर श्री गोवर्धन लाल महाराज यांनी त्यांच्या उदरनिर्वाहाची जिम्मेदारी घेली. त्यांना नाथद्वारा मंदिरामध्ये कीर्तनकाराच्या स्वरूपात काम करण्याची संधी मिळाली. पुरूषोत्तम दासजी आपल्या वडिलांच्या जागी पखवाजवादन चे कार्य करत होते. ते नाथद्वारा मंदिराद्वारे असणाऱ्या **श्रीनाथ संगीत शिक्षण केंद्र** याचे त्यांनी काम केले. पुरूषोत्तम दास यांनी १९६५ साली भारतीय कला केंद्र, दिल्ली या ठिकाणी कार्यभार स्वीकारला. **तसेच त्यांनी १९६१ ते १९८६ या कालावधीमध्ये अखिल भारतीय हवेली संगीत समारोह चे आयोजन केले होते.**

पुरूषोत्तम दास यांना १९६४ साली भारत सरकारने **पद्मश्री** या पुरस्काराने सन्मानित केले होते. राजस्थान संगीत नाटक अकादमीने १९८९ साली सन्मानित केले. दिल्ली येथून निवृत्त झाल्यानंतर श्रीनाथ संगीत शिक्षण केंद्र या ठिकाणी प्राचार्य म्हणून कार्यरत राहिले. अशा या पखवाज वादक यांचा मृत्यू १९९१ साली झाला.

पं. गोविंदराव बह्राणपुरकर

गोविंदराव बऱ्हाणपूरकर यांचा जन्म मध्यप्रदेश मधील **निमाड** जिल्ह्यातील **बऱ्हाणपूर** या गावी झाला. त्यांचे पखवाजाचे शिक्षण नानासाहेब पानसे यांचे शिष्य, सखारामजी यांच्याकडे झाले. गोविंदराव बऱ्हाणपूरकर यांच्या घरामध्ये संगीताचे वातावरण होते, त्यांनी धृपद आणि धमार या गायन शैलीचा अभ्यास त्यांच्या आत्या कोपरगावकर यांच्याकडे घेतला. तबल्याचे शिक्षण हैदराबाद येथील पंडित वामनरावजी यांच्याकडून घेतले. उत्कृष्ट पखवाज वादक आणि तबला वादक असल्यामुळे त्यांचा संपर्क पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांच्याशी देखील आला होता. त्यांनी देश भ्रमणाशिवाय वर्मा आणि सिलोन या देशांमध्ये प्रवास केला होता. गोविंदराव कुलकर्णी यांनी **'मृदंग तबला वादन सुबोध'** तसेच भारतीय **'ताल मंजिरी'** ही पुस्तके प्रकाशित केली होती. त्यांच्या पखवाजाचा प्रचार आणि प्रसार कार्यामुळे त्यांना वेगवेगळ्या पद्विंनी सन्मानित करण्यात आले होते. **१९२९ साली अहमदाबाद येथील संगीत समारोहामध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांनी त्यांना 'मृदंगाचार्य' ही पदवी दिली.** तसेच गांधर्व महाविद्यालय, दिल्ली येथे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या द्वारे देखील त्यांना सन्मानित करण्यात आले. त्यांनी नर्तक उदय शंकर यांच्या 'कल्पना' चित्रपट तसेच शासकीय चित्रपट

विभागात देखिले वादन केले होते. पं. गोविंदराव बऱ्हाणपूरकर यांचा मृत्यू २० जून १९५७ रोजी वयाच्या ८० व्या वर्षी झाला.

त्यांच्या शिष्य परंपरेत पं. बाबुराव डवरी गुरुजी यांचा समावेश होतो.

पं. बाबुराव डवरी

पं. डवरी बाबुराव गुरुजी : (१८९९-१९९९). तालमनी कै. पं. बाबुराव डवरी गुरुजी यांचा जन्म महाराष्ट्रातील, बीड जिल्ह्यातील नेकनूर या गावी झाला गुरुजी हे ह.भ.प. बंकटस्वामी महाराज यांचे शिष्य होते. त्यांनी केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राच्या बाहेरही म्हणजेच इतर राज्यातही पखवाजाचा प्रचार आणि प्रसार केला. डवरी गुरूजी हे नाथसंप्रदायाशी संबंधित होते. लहानपणापासूनच त्यांच्या अंगात सूर, ताल आणि लय हे उपजतच होते. त्यांचे वडील श्री. भागुजी हे डमरू म्हणजेच डवर वाद्य उत्कृष्ट पद्धतीने वाजवत असत. हे वाद्य गुरुजींनी लीलया अवगत केले. नंतरच्या कालावधीत गुरुजींना भजन कीर्तन याची आवड लागली. असे म्हणतात की 'बाळाचे पाय हे पाळण्यात दिसतात' त्याचप्रमाणे गुरुजींनी **देवडी** हे तालवाद्य वाजवताना बंकटस्वामी महाराजांनी पाहिले आणि त्यांनी गुरुजींना विचारले की पखवाज शिकणार का? त्यावेळेस गुरुजींनी कसलाही विचार न करता हो म्हणून उत्तर दिले. वयाच्या अवघ्या आठव्या वर्षीच गुरुजींनी पखवाज अध्ययनास सुरुवात केली. **त्यांचे पुढील शिक्षण पानसे घराण्याचे मृदंगाचार्य पं. गोविंदराव बऱ्हाणपूरकर यांच्याकडे झाले.** बऱ्हाणपूर येथे त्यांनी गुरू-शिष्य परंपरेने पखवाजाचे ज्ञानार्जन केले. त्यानंतर मुंबई आणि कलकत्ता या ठिकाणी त्यांचे नंतरचे शिक्षण

पूर्ण झाले. गुरुजींच्या वादनामध्ये नाना पानसे घराणे आणि नाथसंप्रदाय यांचा संगम दिसून येतो.

विद्यार्थ्यांना लक्षात यावी अशी लिपी पद्धती गुरुजींनी विकसित केली त्याला **'तालाचे घड्याळ'** म्हणून ओळखले जाते. गुरुजींनी त्यांच्या संपूर्ण आयुष्यामध्ये कोणत्याही प्रकारची लालसा मनात न ठेवता किंवा प्रसिद्धीच्या मागे न जाता गावोगावी प्रवास करून पखवाज अध्यापनाचे कार्य केले. पैठण, पंढरपूर, आळंदी यासारख्या तीर्थ क्षेत्राच्या ठिकाणी विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणामध्ये पखवाज ज्ञान प्रदान करत होते. भजन आणि कीर्तन याबरोबरच स्वतंत्र पखवाज वादन, धृपद, धमार या शास्त्रीय गायकीस समर्पक साथ.संगत अतिशय लिलया पद्धतीने करत असत. त्यांना ह. भ. प. वामनभाऊ महाराज, ह. भ. प. बंकटस्वामी महाराज, ह. भ. प. भीमसिंह महाराज, चाकरवाडी चे ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली महाराज आदि संतांचा सहवास लाभला, त्यांच्या सहवासात त्यांनी पखवाज वादनाचे कार्य केले. त्यांचा स्वभाव हा एक शिक्षक म्हणून तर उत्कृष्ट होताच परंतु एक मनुष्य म्हणून देखील त्यांची वेगळी ओळख होती. त्यांचा स्वभाव हा विनोदी होता, त्यामुळे आजूबाजूचे लोक आणि शिष्य आनंदाने शिक्षण घेत असत. त्यांच्या शिक्षकी स्वभावामुळे मोठ्या प्रमाणामध्ये शिष्यवर्ग निर्माण झाला. **त्यांच्या कार्याबद्दल महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरदचंद्र पवार यांनी त्यांना 'मृदंगमहर्षी' म्हणून संबोधित केले.**

वयाच्या नव्वदाव्या वर्षा पर्यंत पखवाज वादनाचे कार्य केले. अशा या महान, नि:स्वार्थी आणि प्रसिद्धीपासून दूर असलेल्या पंडित बाबुराव गुरुजी यांचे निधन वयाच्या शंभराव्या वर्षी म्हणजेच १९९९ साली झाले.

गुरुजींच्या पश्चात त्यांचे नातू प्यारेलाल चव्हाण, (डवरी) नेकनूर, लक्ष्मीकांत चव्हाण (आळंदी), शिष्य श्री. पांडुरंग महाराज वैद्य-आळंदी, पंडित श्री. तुकाराम भूमकर गुरुजी- पुणे, श्री पांडुरंग दातार, श्री. अभिमन्यु मुळे - माजलगांव, श्री. दासोपंत स्वामीजी-आलंदी और अन्य शिष्य इस विरासत को आगे बढ़ा रहे हैं। श्री दासोपंत स्वामी (आळंदी) हे पखवाजाच्या प्रचार आणि प्रसाराचे कार्य करत आहेत.

मृदंगाचार्य, तालमणी पं. कै. बाबुराव डवरी गुरुजी यांची समाधि,

श्री क्षेत्र आळंदी, महाराष्ट्र

गुरुजींचे हस्ताक्षर





पं. शंकर बापू आपेगावकर

९ जून १९१३ रोजी पं. शंकर बापू आपेगावकर यांचा जन्म झाला. यांचे पूर्ण नाव शंकर मारुती शिंदे हे आहे. त्यांचा जन्म शेतकरी कुटुंबामध्ये झाला. त्यांचे शालेय शिक्षण नववी पर्यंत झाले होते. आणि पखवाजाचे प्राथमिक शिक्षण कुटुंबांमध्ये झाले, याशिवाय मथुरा येथील मखन्नजी भैया यांच्याकडून त्यांनी पखवाजाचे पुढील शिक्षण प्राप्त केले. शंकर बापू आपेगावकर हे असे पखवाजवादक होते की ज्यांनी स्वतंत्र पखवाज वादन आणि धृपद, धमार या शास्त्रीय गायन प्रकारास ७० वर्ष साथ संगत केली, त्याबरोबरच त्यांनी लांब पल्ल्याचा प्रवास करून पखवाजाचा प्रचार आणि प्रसार करण्याचे कार्य केले.

शंकर बापू आपेगावकर यांनी धार्मिक क्षेत्राशी सलोख्याचा संबंध ठेवला होता. याचाच परिणाम म्हणून ते वेगवेगळ्या धार्मिक संस्थेशी जोडले गेले होते. यामध्ये प्रामुख्याने श्री क्षेत्र आळंदी हिंदू परिसर आणि पंढरपूर विकास समिती, बंकट्स्वामी ट्रस्ट चे विश्वस्त म्हणून कार्य केले, त्याबरोबरच पैठण येथील कार्यकारी निर्देशक संतपीठ यासारख्या संस्थांशी शंकर बापू आपेगावकर जोडले गेले होते. त्याबरोबरच शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये देखील संस्थापक आणि संचालक म्हणून कार्य केले. यामध्ये पुढील संस्थांचा समावेश होतो; पद्मश्री शंकर बापू प्रतिष्ठान नांदेड, पद्मश्री शंकर बापू हायस्कूल

ससेगाव, यासारख्या वेगवेगळ्या संस्थेत मोलाची भूमिका पार पाडली. त्यांच्या सांगीतिक कार्याबद्दल त्यांना भारत सरकारने पद्मश्री या पुरस्काराने सन्मानित केले, याशिवाय त्यांना पखवाज रत्न, नाना पानसे पुरस्कार, ताल विलास या सारख्या वेगवेगळ्या पुरस्कारांनी गौरवान्वित करण्यात आले. शंकर बापू आपेगावकर हे आकाशवाणीच्या ए श्रेणीतील कलाकार होते. ९ जानेवारी २००३ रोजी शंकर बापू आपेगावकर यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचे सुपुत्र पं. उद्धवराव शिंदे आपेगावकर वारसा चालवत आहेत.

संदर्भ

१. मृदंग वादन, भाग-१, श्री. विश्वनाथ रामचंद्र काळे, न्याशनल पब्लिकेशन, मुंबई, १८६७.

२. पखावज, और तबला के घरानें एवं परम्परायें, डॉ. आबान ए. मिस्त्री, पं. केकी एस. जिजिना, स्वर साधना समिति, मुंबई. १९८४.

३. ताल परिचय, श्री. गिरीश चंद्र श्रीवास्तव, रुबी प्रकाशन, इलाहाबाद, २०१८.

४. साथसंगत, श्री. वसंत लेले, जय भारत प्रिंटींग प्रेस, ठाणे, १९९४.